मासिक अंक
खाजगी वितरण




MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

# महाआयटी संवाद

तिसरा अंक - मे 2026

## नागरिक-केंद्रित शासन

डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून
प्रत्येक नागरिकाचे सक्षमीकरण

**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित**

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# या अंकात...

**संपादकीय** 1
सेवा वितरणापासून विश्वास निर्मितीकडे: डिजिटल शासनाचे पुढचे पाऊल

**मुख्य कथा** 2
सुगम्य शासनासाठी जीपीआर: सार्वजनिक सेवांची नवी परिभाषा

**डेटा गव्हर्नन्स** 4
ग्रॅन्युलर ट्रॅकिंगमुळे महाराष्ट्रातील नागरिक सेवांमध्ये परिवर्तन

**आरटीएस डॅशबोर्ड** 6
महाराष्ट्रात डेटा-आधारित प्रशासनाचे सक्षमीकरण

**टीम माइलस्टोन** 8
महाआयटी आरटीएस टीम: उत्कृष्ट सहकार्याचे फलित

**नागरिकांचा आवाज** 9
नागरिक-केंद्रित प्रशासनाचे एक नवे पर्व

**माणुसकीचा हात** 11
वैद्यकीय अडचणीच्या वेळी रुग्णालयापर्यंत पोहोचली आधार सेवा

**डिजिटल-सक्षम ग्रामीण महाराष्ट्र** 12
नाशिकमधल्या दुर्गम गावात डिजिटल क्रांतीची पावले

**जिद्द, साथ आणि सेवा** 13
सेवा केंद्रांच्या माध्यमातून घडले परिवर्तन: बोंगाणे दाम्पत्याच्या जिद्दीची कहाणी

**लास्ट माईल इम्पॅक्ट** 16
महाआयटीमुळे राहुरीत नागरिक सेवांचे प्रभावी परिवर्तन

**प्रशासन पोहोचले घरोघरी** 17
सक्षम प्रशासन, सक्षम नागरिक: समाधान शिबिरे

**नागरिक प्रथम** 19
तळागाळापर्यंत पोहोचते आहे आधार सेवा!

**सक्षम नागरिक** 20
कुडाळमध्ये आधार संच वितरणामुळे नागरिक सेवा अधिक सुलभ होणार

**डिजिटल सेवांचा प्रसार** 22
मुंबईतील वर्दळीच्या ठिकाणी 'आपले सरकार' पोर्टलचा प्रभावी प्रसार

**आधार शिबिरे** 23
लातूरमध्ये आधार शिबिरांचे आयोजन

**माननीय राष्ट्रपतींचा वर्धा दौरा** 24

**शासन व्यवस्थेची क्वांटम झेप!** 25
अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगासाठी महाराष्ट्राचा धोरणात्मक आराखडा

**सार्वजनिक सेवेला नवी दिशा** 27
मुलुंडमध्ये सेतू सुविधा केंद्रामुळे स्मार्ट प्रशासनाला बळ

**क्षमता विकास** 28
डिजिटल शासनामध्ये क्षमता विकासासाठी महाआयटी आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांची भागीदारी



# संपादकीय


## भगवान पाटील

मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी


## सेवा वितरणापासून विश्वास निर्मितीकडे: डिजिटल शासनाचे पुढचे पाऊल

महाराष्ट्रातील डिजिटल शासनाचा प्रवास एका निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे, जो निव्वळ सेवा वितरणाच्या पलीकडे जात विश्वास, पारदर्शकता आणि नागरिक-केंद्रिततेला प्राधान्य देणारा आहे. शासन हे केवळ कार्यक्षमतेपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते अनुभव, विश्वासार्हता आणि सर्वसमावेशकतेसह आगेकूच करत आहे, हे या अंकातील लेखांमधून स्पष्टपणे दिसून येते.

या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी एक साधी पण प्रभावी कल्पना आहे, ती म्हणजे नागरिकांचे म्हणणे ऐकून घेणे. आयव्हीआरएस (IVRS) आधारित अभिप्राय प्रणालीमुळे ज्यांच्याकडे स्मार्टफोन किंवा डिजिटल साक्षरता नाही, तेसुद्धा आपले अनुभव सामायिक करू शकत आहेत. ही केवळ तांत्रिक बाब नाही; तर तो लोकशाहीवादी उपक्रम आहे. यामुळे अभिप्रायाचे मोजता येण्याजोग्या 'नागरिक गुणां'मध्ये (Citizen Scores) रूपांतर करून, प्रशासकीय प्रणाली आता कामगिरीइतकेच लोकांच्या अभिप्रायालाही महत्त्व देऊ लागल्या आहेत.

प्रशासकीय प्रक्रियांची पुनर्रचना देखील तितकीच महत्त्वाची आहे. अर्जांचे सुलभीकरण, आवश्यक कागदपत्रांच्या संख्येत कपात आणि आधार-आधारित पडताळणीच्या एकत्रीकरणामुळे, एकेकाळी किचकट असलेली प्रक्रिया आता एक सुलभ अनुभव बनली आहे. दुर्गम आणि आदिवासी भागांतील नागरिकांसाठी ही केवळ सोय नाही, तर हे त्यांचे सक्षमीकरण आहे. खरी सुधारणा ही गुंतागुंतीचे डिजिटायझेशन करण्यात नसून, गुंतागुंत दूर करण्यात आहे, हे प्रशासकीय प्रक्रियांच्या पुनर्रचनेने दाखवून दिले आहे.

सार्वजनिक सेवा वितरणातील पारदर्शकता हे आतापर्यंत मोठे आव्हान वाटत असे, आता मात्र सूक्ष्म ट्रॅकिंग प्रणालीमुळे सेवा वितरणातील पारदर्शकता सहजसाध्य होते आहे. नागरिकांना अर्जांचा टप्प्याटप्प्याने मागोवा घेता येतो, त्यामुळे अनिश्चिततेची जागा सुस्पष्टतेने घेतली आहे. यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते आणि प्रणालीवरील विश्वास वाढतो. आपला अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे आणि का, हे नागरिकांना पाहता येते, तेव्हा शासन पारदर्शकतेच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकते.

आरटीएस डॅशबोर्ड हा या नागरिक-केंद्रित सुधारणांना पूरक असणारा सक्षम प्रशासकीय आधारस्तंभ ठरतो आहे. विविध विभागांमधील डेटा एकत्रित करून आणि तो वास्तविक विश्लेषणाद्वारे सादर करून, हा डॅशबोर्ड निर्णय घेणाऱ्यांना कृतीयोग्य तपशील प्रदान करतो. वेळेवर कार्यवाही आणि नागरिक गुण (Citizen Scores) अशा मापदंडांच्या समावेशामुळे कार्यक्षमता आणि समाधान यांचा समतोल साधत शासनाचे सर्वांगीण मूल्यांकन केले जाईल, याची खातरजमा केली जाते आहे.

एकंदर पाहता हे उपक्रम एका मोठ्या स्थित्यंतराचे संकेत देणारे आहेत. महाराष्ट्र 'सेवा प्रदान' करण्याच्या भूमिकेमधून 'सेवा हमी' देण्याच्या भूमिकेकडे वाटचाल करत आहे. या उपक्रमाने केवळ परिणाम साध्य करण्यावरच नव्हे, तर सेवा प्राप्तीच्या प्रक्रियेत नागरिकांचे म्हणणे ऐकले जात आहे, त्यांना माहिती दिली जात आहे आणि त्यांचा आदर केला जात आहे, याची खात्री करण्यावरही लक्ष केंद्रित केले आहे.

डिजिटल भारत विकसित होत असताना, मानवी स्पर्श असणारे तंत्रज्ञानच सर्वात जास्त प्रभावी ठरते, हा महत्त्वाचा धडा, महाराष्ट्राची ही वाटचाल देते; कारण एखादी प्रणाली किती जणांना सेवा देते, यापेक्षा त्या प्रणालीमुळे किती लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडला, हे जास्त महत्वाचे आहे.

# मुख्य कथा




## सुगम्य शासनासाठी जीपीआर: सार्वजनिक सेवांची नवी परिभाषा

नागरिक-केंद्रित डिजिटल महाराष्ट्राच्या दिशेने सुरू असलेल्या प्रवासात, आघाडीच्या 18 सार्वजनिक सेवांची शासन प्रक्रिया पुनर्रचना - जीपीआर हा एक परिवर्तनात्मक टप्पा आहे. मुळात ही प्रक्रिया केवळ डिजिटायझेशनपुरती मर्यादित नाही, तर ती शासकीय सेवांची पुनर्रचना करून त्यांना अधिक सोपे, जलद आणि सुलभ बनवणारी आहे. गुंतागुंतीच्या प्रक्रियांचा त्रास सहन करावा लागत असलेल्या वंचित समुदायांसाठी विशेषतः हे वरदान ठरणार आहे.

उत्पन्न किंवा रहिवासी प्रमाणपत्रासारख्या अत्यावश्यक शासकीय सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेक वर्षे लांबलचक अर्ज भरणे, कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागणे, भरमसाठ कागदपत्रे जोडणे आणि मंजुरीच्या अनेक स्तरांमधून जावे लागणे, अशा लांबलचक प्रक्रियेला सामोरे जावे लागत असे. दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरिकांना याचा खूप त्रास होत असे. जनजागृतीचा अभाव आणि आर्थिक अडचणींमुळे हे आव्हान आटोक्यात येत नव्हते.

आज हे चित्र बदलते आहे. जीपीआर प्रक्रियेने अनावश्यक टप्पे दूर करून आणि नागरिकांवरील प्रक्रियात्मक भार कमी करून सेवा वितरणात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. पूर्वी अधिवास प्रमाणपत्राच्या अर्जामध्ये 50 पेक्षा जास्त रकाने होते, आणि त्यासाठी अनेक पूरक कागदपत्रांची आवश्यकता होती. आता मात्र रकाने आणि कागदपत्रांची संख्या कमी करण्यात आली आहे. उत्पन्न प्रमाणपत्राचे अर्जही सुव्यवस्थित करण्यात आले आहेत, ज्यात बॅकएंड डेटा इंटिग्रेशनच्या साहाय्याने आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करण्यात आली आहे.

हा बदल केवळ प्रशासकीय नाही, तर त्याचा मानवी जीवनावरही सखोल परिणाम दिसून येतो आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिला सविता यांचे उदाहरण पाहूया. आपल्या मुलीच्या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्यांना सुमारे 40 किलोमीटर दूर असलेल्या तहसील कार्यालयात किमान दोनदा जावे लागत असे. दरवेळी एका दिवसाची मजुरी गमवावी लागत असे आणि प्रवासाची साधनेसुद्धा उपलब्ध नसल्यामुळे मोठी गैरसोय होत असे. पुनर्रचित प्रणालीमुळे सविता जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत अर्ज करू शकल्या आणि तिथे आधार-आधारित प्रमाणीकरणामुळे त्यांची बहुतेक माहिती आपोआप भरली गेली. अर्जावर त्वरित प्रक्रिया होऊन तातडीने प्रमाणपत्र मिळाले, आणि त्यांच्या मुलीला वेळेवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणे शक्य झाले.

नंदुरबारमध्ये रामेश्वर नावाच्या एका विद्यार्थ्याला महाविद्यालयीन प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्र हवे होते. पूर्वी या प्रक्रियेमध्ये अनेक मंजुऱ्या आणि कागदपत्रांच्या पडताळणीचा समावेश होता. जीपीआर अंतर्गत ही प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यात आली आहे, ज्यामुळे मंजुरीचे टप्पे कमी झाले आहेत आणि प्रमाणपत्र अधिक वेगाने जारी करणे शक्य झाले आहे. रामेश्वर यांना त्यांचे प्रमाणपत्र काही दिवसांतच मिळाले, ज्यासाठी पूर्वी काही आठवडे लागत होते.

'स्मार्ट इंटिग्रेशन' हे वैशिष्ट्य या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहे. आधार-आधारित ई-केवायसी, डेटाबेस लिंकेज आणि अर्जातील आपोआप भरल्या जाणाऱ्या माहितीमुळे वारंवार डेटा एन्ट्री करण्याची आणि प्रत्यक्ष कागदपत्रे सादर करण्याची गरज लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. नागरिकांना आता त्यांची ओळख किंवा रहिवास वारंवार सिद्ध करण्याची गरज नाही. ही प्रणाली डिजिटल पद्धतीने पडताळणी करते, ज्यामुळे चुका कमी होतात आणि कार्यक्षमता वाढते.

ज्येष्ठ नागरिकांसाठी हा बदल विशेष उपयुक्त ठरतो आहे. विदर्भातील एका छोट्या गावातील 68 वर्षीय शंकर नावाच्या रहिवाशाला स्थानिक केंद्रावरील सेवेद्वारे वयाचे प्रमाणपत्र मिळवता आले. सोप्या इंटरफेसमुळे आणि कमी कागदपत्रांमुळे त्यांना मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागले नाही, किंवा वारंवार कार्यालयात जावे लागले नाही.

टप्प्यांची कमी झालेली संख्या ही या प्रक्रियेतील आणखी एक महत्त्वपूर्ण सुधारणा होय. पूर्वी अर्ज अनेक विभागांमधून फिरत असत.

त्यामुळे विलंब आणि अनिश्चितता निर्माण होत असे. जीपीआरने मंजुरीचे स्तर कमी केले आहेत, अनावश्यक प्रत्यक्ष पडताळणी दूर केली आहे आणि संपूर्ण डिजिटल कार्यप्रणाली सक्षम केली आहे. यामुळे केवळ प्रक्रियेला गती मिळत नाही, तर उत्तरदायित्व आणि पारदर्शकता देखील वाढली आहे.

रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांसाठीही हे वरदान ठरते आहे. बीड जिल्ह्यातील तुकाराम नावाच्या एका शेतमजुराने सांगितले की कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाचा दाखला मिळवण्याकरिता त्याला पूर्वी अनेकदा कामावरून सुट्टी घ्यावी लागत असे. आता जलद प्रक्रिया आणि कमी टप्प्यांमुळे तो आपला रोजगार न गमावता अत्यंत कमी वेळेत आपले प्रमाणपत्र मिळवू शकला.

उपेक्षित घटकांचे सक्षमीकरण हा जीपीआरचा व्यापक परिणाम आहे. 'आपले सरकार' मंचाद्वारे सेवा उपलब्ध करून दिल्याने, मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होते, सेवा मिळवण्याचा खर्च कमी होतो आणि ज्या नागरिकांना पूर्वी औपचारिक व्यवस्थेतून वगळल्यासारखे वाटत होते, त्यांना सन्मानाने सेवा प्राप्त होते.

शिष्यवृत्ती, आरक्षण आणि कल्याणकारी लाभ मिळवण्यासाठी अत्यावश्यक असलेले उत्पन्नाचे दाखले आता अधिक सोपे आणि जलद गतीने मिळतात. यामुळे विशेषतः ज्या ठिकाणी जागरूकता आणि उपलब्धता मर्यादित होती, तिथे लाभार्थ्यांपर्यंत लाभ विनाविलंब पोहोचू लागले आहेत.

शासनावर विश्वास निर्माण करण्यात जीपीआरची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सोपी प्रक्रिया, कमी कागदपत्रे आणि डिजिटल ट्रॅकिंग यंत्रणा एक अशी प्रणाली तयार करतात जी नागरिकांना पारदर्शक आणि वेळेत सेवा देण्यास कटिबद्ध आहे. नागरिक आता त्यांच्या अर्जांवर लक्ष ठेवू शकतात, सद्यस्थिती पाहू शकतात आणि त्यांना डिजिटल पद्धतीने पडताळणी करता येणारी प्रमाणपत्रे मिळतात, ज्यामुळे संदिग्धता आणि भ्रष्टाचाराच्या संधी कमी होतात. शिवाय मानकीकरणामुळे, मुंबई असो वा दुर्गम गाव, सगळीकडे एकसमान सेवा वितरण सुनिश्चित होते. ही राज्यस्तरीय सुसंगती अत्यंत महत्त्वाची आहे.

महाराष्ट्रासारखे वैविध्यपूर्ण राज्य पाहता या 18 सेवांची पुनर्रचना माहिती तंत्रज्ञानावर आधारित सुसज्ज शासनाचा पाया घालते. यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित सेवा वितरण, औपचारिक अर्जांशिवाय सेवा देणारे सक्रिय शासन आणि विविध विभागांमधील समन्वयाचे मार्ग खुले होतात.

थोडक्यात जीपीआर ही एक शक्तिशाली प्रशासकीय क्रांती आहे. ही प्रक्रिया राज्य शासन आणि नागरिक यांच्यातील संबंधांमध्ये परिवर्तन घडवते. नागरिकांसाठी ही केवळ सुधारणा नाही, तर हा खरा मूलभूत बदल आहे आणि या बदलामध्येच खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक डिजिटल महाराष्ट्राचे भवितव्य सामावलेले आहे.



# डेटा गव्हर्नन्स


## मुकेश शर्मा
प्रकल्प व्यवस्थापक, महाआयटी


## ग्रॅन्युलर ट्रॅकिंगमुळे महाराष्ट्रातील नागरिक सेवांमध्ये परिवर्तन

नंदुरबार जिल्ह्यातील एका दुर्गम गावात, मंगू पावरा या आदिवासी शेतकऱ्याने अलीकडेच त्याच्या जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर महाडीबीटी कृषी योजनेअंतर्गत आर्थिक मदतीसाठी अर्ज केला होता. अनेक नागरिकांप्रमाणेच त्याच्या मनात एक स्वाभाविक प्रश्न होता, "माझ्या अर्जाची सद्यस्थिती काय आहे?"

काही काळापूर्वी या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर देणे कदाचित कठीण झाले असते. उत्पन्न प्रमाणपत्र असो, जात प्रमाणपत्र असो किंवा महाडीबीटी योजनांतर्गत लाभ प्राप्त करणे असो, अशा सर्व शासकीय सेवांसाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांना या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव जाणवत असे. एकदा अर्ज सादर केल्यावर त्या अर्जावर काय प्रक्रिया होते, तो कोणत्या टप्प्यावर आहे, हे जाणून घेणे अशक्य वाटत असे. आपल्या अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी अर्जदारांना शासकीय कार्यालयांना वारंवार भेट द्यावी लागत असे, दूरध्वनीवरून माहिती घ्यावी लागत असे किंवा स्थानिक मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागत असे.

अनेक प्रकरणी शासकीय सेवा विलंबाने दिल्या जात होत्या आणि त्याचबरोबर नागरिकांचा शासकीय सेवा यंत्रणेवरचा विश्वासही कमी होऊ लागला होता. आता मात्र हे चित्र बदलते आहे. महाराष्ट्र शासन, शासकीय सेवा आणि महाडीबीटी योजनांसाठी एक सूक्ष्म आणि प्रत्येक टप्प्यावर अर्जाचा मागोवा घेणारी प्रणाली सुरू करते आहे. नागरिक सेवा वितरणात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि वास्तविक चित्र स्पष्ट करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो आहे.

या नवीन प्रणालीमध्ये, 'आपले सरकार पोर्टल' सारख्या मंचामार्फत सादर केलेला प्रत्येक अर्ज विविध टप्प्यांमध्ये विभागला जातो. आपला अर्ज नेमका कोणत्या टप्प्यावर आहे, हे जाणून घेताना नागरिकांना 'प्रलंबित' हा एकच शेरा दिसत नाही, तर या प्रणालीमुळे नागरिक टप्प्याटप्प्याने आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात. अर्जाचे सादरीकरण, पडताळणी, मंजुरी आणि वितरण अशा टप्प्यांवर नागरिकांना आपल्या अर्जाचा मागोवा घेता येतो.

'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध असलेल्या 900 पेक्षा जास्त सेवा आणि महाडीबीटी पोर्टलवर असलेल्या 92 योजनांचा मागोवा, या प्रणालीद्वारे नागरिकांना घेता येतो, त्यामुळे राज्यभरातील नागरिकांना अर्ज केल्यापासून प्रत्यक्ष सेवा प्राप्त होण्यापर्यंतचा प्रवास पारदर्शकपणे जाणून घेता येतो. अर्जाच्या प्रत्येक टप्प्याची सद्यस्थिती दर्शविणारी ही प्रणाली शासकीय यंत्रणेवरील नागरिकांचा विश्वास दृढ करते आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 शी सुसंगत असणारी ही प्रणाली नागरिकांनी केलेल्या अर्जावर प्रक्रिया होण्यासाठी लागणारा अंदाजित वेळ देखील दर्शवते, ज्यामुळे नागरिकांना संबंधित सेवा वितरणासाठी निश्चित केलेल्या कालमर्यादेची माहिती मिळते. अर्जावर कार्यवाही होण्यास विलंब होत असल्यास त्याबाबतची सूचनाही ही प्रणाली देते. अशा सूचनेमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या अचूक नोंदींचा समावेश असतो, त्यायोगे अर्जदारांना स्पष्ट आणि योग्य माहिती मिळते, आणि सेवा वितरण प्रक्रियेतील अनिश्चितता कमी होते.

या प्रणालीमुळे, आपला अर्ज यशस्वीरित्या सादर झाला आहे, दस्तावेजांची पडताळणी सुरू आहे, तो कोणत्या अधिकारी स्तरावर प्रलंबित आहे, आणि तो कारणांसहित मंजूर झाला आहे की नामंजूर झाला आहे, हे मंगू पावरा यांना आता स्पष्टपणे समजू शकते. या सुस्पष्टतेमुळे गोंधळाची जागा आत्मविश्वासाने घेतली आहे, आणि नाराजीची जागा समाधानाने घेतली आहे.

### प्रत्यक्ष परिणाम

नंदुरबार जिल्ह्यातच मीना तडवी या आदिवासी मातेने आपल्या मुलीसाठी महाडीबीटी शिक्षण योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. यापूर्वी अशा अर्जांसाठी बराच काळ प्रतीक्षा

करावी लागत असे, आणि पुढे काय होणार, याची फारशी माहिती मिळत नसे. आपला अर्ज पुढे सरकला आहे की नाही, हे तपासण्यासाठी, वेळ आणि पैसा दोन्ही खर्च करून मीनाला वारंवार तालुका कार्यालयात जावे लागत असे. मात्र नव्या प्रणालीमुळे मीनाचा आजचा अनुभव वेगळा आहे.

सूक्ष्म मागोवा घेणे शक्य झाल्यामुळे मीना आता आपले सरकार सेवा केंद्रामार्फत आपल्या अर्जाच्या सद्यस्थितीवर लक्ष ठेवू शकते. आपला अर्ज पडताळणी पूर्ण करून मंजुरीच्या टप्प्यावर जात असल्याचेही तिला लगेच कळू शकते आणि विलंब झाल्यासुद्धा, अर्ज नेमका कोणत्या टप्प्यावर प्रलंबित आहे हे प्रणालीमध्ये दिसून येते. आपल्याला आपल्या अर्जाचा मागोवा घेण्यासाठी कोणावर अवलंबून राहावे लागत नाही, हा अनुभव तिच्यासाठी अनोखा आहे.

आपल्या अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी किंवा मागोवा घेण्यासाठी कोणावर अवलंबून राहावे न लागणे, हे या प्रणालीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आहे. या पारदर्शकतेच्या अभावामुळे नागरिकांना आतापर्यंत मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागत असे किंवा सरकारी कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या. नव्या प्रणालीमध्ये प्रत्येक टप्प्यावर मिळणारी माहिती, निश्चित कालमर्यादा आणि सद्यस्थितीच्या सुस्पष्ट चित्रामुळे नागरिक अगदी सहजपणे आपल्या अर्जाचा मागोवा घेऊ शकतात.

नंदुरबारसारख्या जिल्ह्यांमधील आदिवासी समुदायांसाठी हा बदल परिवर्तनकारी आहे. यामुळे प्रवासाचा त्रास कमी होतो, खर्चात बचत होते आणि नागरिकांना थेट माहिती देऊन सक्षम केले जाते. महत्त्वाचे म्हणजे यामुळे शासकीय प्रणालीवर विश्वास निर्माण होतो.




*ग्रॅन्युलर ट्रॅकिंग डॅशबोर्डवर दृष्टीक्षेप*

## विश्वासार्हता जपणारे सक्षम प्रशासन

ग्रॅन्युलर ट्रॅकिंगचा प्रभाव केवळ नागरिकांपुरता मर्यादित नाही, तर तो प्रशासकीय यंत्रणांनाही प्रभावित करणारा आहे. अर्ज प्रक्रियेचा प्रत्येक टप्पा एका जबाबदार अधिकारी/विभागाशी जोडलेला असतो. यामुळे होणारा विलंब या यंत्रणेमध्ये लपून राहत नाही. एखादा अर्ज प्रलंबित असेल, तर तो कोणत्या विशिष्ट टप्प्यावर आणि अधिकाऱ्यापर्यंत पोहोचला आहे, हे त्वरित शोधता येते.

यामुळे प्रलंबित अर्जांवर लक्ष ठेवणे, समस्यांचे जलद निराकरण करणे आणि विहित कालमर्यादेत सेवा वितरण करणे शक्य होते. थोडक्यात सांगायचे तर प्रशासनाला विश्वासार्हता बहाल करणारी ही प्रणाली आहे, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासनाच्या दृष्टिकोनाशी सुसंगत अशी ही प्रणाली आहे, जिथे सेवा केवळ ऑनलाइन नाहीत, तर पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित सुद्धा आहेत.

आपले सरकार पोर्टल दीर्घ काळापासून नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून देते आहे. या प्रणालीच्या माध्यमातून अर्जाचा वास्तविक मागोवा घेण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांसाठी ते वरदान ठरते आहे. सक्रिय सेवा वितरण, विलंब होत असल्यास एआय-आधारित सूचना आणि निर्णय घेणाऱ्यांसाठी एकात्मिक डॅशबोर्डच्या माध्यमातून ही प्रणाली प्रशासनातील कार्यक्षमता आणि प्रतिसादक्षमता वाढवण्याच्या कामी उपयुक्त ठरते आहे. सेवा वितरणाकडून सेवा पारदर्शकतेकडे होणारा हा प्रवास शासनाची विश्वासार्हता वाढवणारा आहे.

डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात महाराष्ट्र आगेकूच करत असताना, अशा उपक्रमांमुळे प्रशासन अधिक समावेशक, पारदर्शक आणि प्रतिसादक्षम बनते. सुशासन म्हणजे केवळ सेवा देणे नाही तर आपल्याला सेवा देणारी प्रणाली पाहता येणे, समजू शकणे आणि त्यामार्फत आपले काम होईल, असा विश्वास प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण होणे, हे खरे सुशासन होय.



# आरटीएस डॅशबोर्ड


## राहुल सुर्वे

विभाग प्रमुख, महाआयटी


## महाराष्ट्रात डेटा-आधारित प्रशासनाचे सक्षमीकरण

राज्यात सुप्रशासन प्रस्थापित करण्यासाठी सेवा प्रदानातील कार्यक्षमता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या बाबी महत्वाच्या ठरतात. प्रशासनाचा अविभाज्य घटक असणाऱ्या सार्वजनिक सेवा वितरणाची वास्तविक देखरेख ही मोठी जबाबदारी आहे. राज्यातील नागरिकांना वेळेवर सेवा मिळतील, याची खातरजमा करण्याच्या कामी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015' मोलाची भूमिका बजावत आहे. गेली अनेक वर्षे राज्यातील नागरिकांना विविध विभागांमार्फत सेवा दिल्या जात आहेत, मात्र या सेवा वितरणाचे स्वरूप सुरुवातीपासून एकसंध नव्हते, काही बाबतीत मानकीकरणाचा अभाव होता. ही विसंगती दूर करून शासकीय सेवा प्रभावीरित्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या कामी एकात्मिक आरटीएस डॅशबोर्डची निर्मिती करण्यात आली आहे. सेवा वितरण अधिक सुसंगत करण्याबरोबरच डेटा-आधारित प्रशासनाच्या नवीन युगाची सुरुवात करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते आहे.

राज्य शासनाचे विविध विभाग सध्या आपापल्या पद्धती आणि देखरेख यंत्रणांसह स्वतंत्रपणे सेवा वितरण करतात. यामुळे अनेकदा डेटाच्या विश्लेषणात विसंगती निर्माण होते, सेवा प्रदानातील अडथळे ओळखण्यास विलंब होतो आणि मंत्री तसेच वरीष्ठ स्तरावर सेवा वितरणाचे पारदर्शक चित्र प्राप्त होणे दुरापास्त होते. या समस्या लक्षात घेत, महाराष्ट्र शासनाने एका एकात्मिक डॅशबोर्डच्या विकसनाला सुरुवात केली. विविध विभागांचा डेटा एकाच मंचावर एकत्रितपणे उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे, ज्यामुळे सेवा वितरण कामगिरीबद्दल सर्वसमावेशक आणि वास्तविक माहिती मिळवणे शक्य होईल.

माननीय मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांपासून जिल्हाधिकारी, विभागांचे प्रमुख आणि सेवा मंजुरीसाठी जबाबदार असलेल्या नियुक्त अधिकाऱ्यांपर्यंत, सर्व हितधारकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आरटीएस डॅशबोर्डची रचना केली आहे. या प्रणालीमध्ये भूमिकेवर आधारित प्रवेश प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक भागधारकाला आपल्या भूमिकेशी संबंधित डेटा सहजपणे उपलब्ध होऊ शकणार आहे.

सेवा वितरणाशी संबंधित कामगिरी दर्शविणाऱ्या निर्देशकांचा (परफॉर्मन्स इंडिकेटर्स) संच, हे आरटीएस डॅशबोर्डचे एक महत्वाचे वैशिष्ट्य होय. या संचामध्ये प्राप्त झालेले, निकाली काढलेले, प्रलंबित आणि नाकारलेले एकूण अर्ज, तसेच कालमर्यादेचे पालन अशा घटकांचा समावेश आहे. सेवा वितरणात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने डॅशबोर्डवर प्रदर्शित केलेले या घटकांचे तपशील उपयुक्त ठरतात. उदा. या डॅशबोर्डवर निर्धारित वेळेत निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी आणि विलंबित अर्जांची टक्केवारी उपलब्ध होते, त्यामुळे अधिकाऱ्यांना त्वरित सुधारणात्मक कारवाई करता येते. अर्थात डॅशबोर्डवर उपलब्ध तपशील कार्यक्षमता सुधारण्याबरोबरच विविध विभागांचे उत्तरदायित्व देखील अधोरेखित करतात.

संयुक्त गुणांचा समावेश हे या मंचाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य. या डॅशबोर्डवर 'वेळेवर सेवा', 'नागरिक अभिप्रायाचे गुण' आणि 'आपले सरकार पोर्टल कामगिरीचे गुण' या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. संबंधित सेवा विहित कालमर्यादेत प्रदान केल्यास 'वेळेवर सेवा' या शीर्षाखाली गुण प्रदान केले जातात तर आयव्हीआरएस यंत्रणेमार्फत प्राप्त नागरिकांच्या अभिप्रायातून 'नागरिक अभिप्रायाचे गुण' या शीर्षाखाली गुण प्रदान केले जातात. हे दोन्ही घटक मिळून 'आपले सरकार पोर्टल कामगिरीचे गुण' प्राप्त होतात. सेवेची गुणवत्ता आणि नागरिकांचे समाधान या बाबींचे मोजमाप करण्याच्या दृष्टीने हे गुण महत्वाचे ठरतात. या गुणांकनात नागरिकांच्या अभिप्रायांचाही समावेश केल्यामुळे मूल्यांकन एकतर्फी राहत नाही, तर ते समावेशक होते.

प्राप्त पुराव्यावर आधारित निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी या डॅशबोर्डमध्ये प्रगत विश्लेषण क्षमतांचाही समावेश करण्यात आला आहे. विभागनिहाय कामगिरी, भौगोलिक भिन्नता, हंगामी कल आणि अर्ज प्रक्रियेच्या परिणामांचे विश्लेषण करण्याचे महत्वपूर्ण काम ही प्रणाली करते. यामुळे प्रशासकांना सेवा प्रदानात जास्त विलंब होणारे भाग ओळखता येतात, सेवेच्या मागणीतील हंगामी वाढीचा अंदाज त्यांना घेता येतो, तसेच प्रलंबित कामांच्या कारणांचे विश्लेषण करता येते. सेवा वितरणासाठी स्रोतांचे वाटप, धोरण निर्मिती आणि

अनुषंगिक उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने अशी माहिती अत्यंत मोलाची ठरते.
डॅशबोर्डचा वापर करणाऱ्यांना राज्य-स्तरीय डेटापासून विभाग, जिल्हा, तालुका आणि अगदी सेवा-स्तरीय तपशिलांपर्यंतचे सुस्पष्ट चित्र अगदी सहजपणे उपलब्ध होते. त्यामुळे सूक्ष्म स्तरावरील समस्या अचूकपणे ओळखणे आणि त्या समस्यांचे निवारण करण्यासाठीच्या उपाययोजना लागू करणे सोयीचे होते. उदा. या डॅशबोर्डवर जिल्हाधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात विलंबाने प्रदान केल्या जाणाऱ्या सेवा किंवा संबंधित विभाग कोणते, हे पाहू शकतात, आणि आवश्यक त्या सुधारणात्मक उपाययोजना तात्काळ राबवू शकतात.

सेवा वितरण संबंधी कामगिरीचे मूल्यांकन सोपे करण्यासाठी आरटीएस डॅशबोर्डवर एक प्रमाणित कलर-कोडिंग प्रणाली देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्ज नाकारण्याचे प्रमाण, नागरिक अभिप्रायाचे गुण' आणि विहित कालमर्यादेत सेवा प्रदान करण्याचे गुण, असे घटक विशिष्ट रंग निर्देशकांचा वापर करून दर्शविले जातात. चांगल्या कामगिरीसाठी हिरवा, मध्यम कामगिरीसाठी पिवळा आणि लक्ष देण्याची आवश्यकता असलेल्या कामगिरीसाठी लाल रंगाचा वापर करण्यात आला आहे. या सोप्या रचनेमुळे डेटा विश्लेषणाशी फारसे परिचित नसलेल्या वापरकर्त्यांनाही कोणत्या घटकाकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे, हे सहजपणे समजू शकते.

सेवा वितरणाच्या देखरेखीबरोबरच या डॅशबोर्डमध्ये अपीलांचा मागोवा घेण्यासाठीच्या मॉड्यूलचा समावेश करण्यात आला आहे. ही प्रणाली पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या अपीलांबाबतचा डेटा, समस्या सादर करण्याचे प्रमाण आणि निराकरणाच्या कालावधीची माहिती संकलित करते. यामुळे तक्रारींवर पद्धतशीरपणे लक्ष ठेवले जाते आणि त्यांचे निवारण केले जाते, परिणामी नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास आणखी दृढ होतो.

सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिक ज्या माध्यमांचा वापर करतात, त्या सर्व माध्यमांवर हा डॅशबोर्ड लक्ष ठेवतो. आपले सरकार सेवा केंद्रे, सेतू केंद्रे आणि ऑनलाइन पोर्टल्स अशा विविध माध्यमांमधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून, ही प्रणाली डिजिटल परिचालन आणि माध्यमांच्या कार्यक्षमतेबद्दल तपशीलवार माहिती प्रदान करते. डिजिटल समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि सेवा वितरण माध्यमांना अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी या माहितीचा उपयोग केला जाऊ शकतो.

शासकीय सेवा प्रभावी पद्धतीने प्रदान करण्यासाठी या एकीकृत आरटीएस डॅशबोर्डची अंमलबजावणी ही निव्वळ तांत्रिक सुधारणा नाही, तर प्रशासनातील आमूलाग्र बदल दर्शवणारा तो एक उपयुक्त मंच आहे. डेटा संकलनाचे मानकीकरण करून, वास्तविक देखरेख करून, जबाबदारीची संस्कृती जोपासणारा हा डॅशबोर्ड प्रशासकांना माहितीवर आधारित निर्णय घेण्यास तसेच जास्त कार्यक्षमतेने सेवा प्रदान करण्यास सक्षम करतो. डिजिटल इंडियाच्या व्यापक दृष्टिकोनाशी आणि नागरिक-केंद्रित प्रशासनाप्रती असलेल्या राज्याच्या वचनबद्धतेशी सुसंगत असा हा उपक्रम आहे.

निरंतर सुधारणा, क्षमता उभारणी तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भविष्यवेधी विश्लेषणासारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हा मंच भविष्यात आणखी सक्षम होत जाईल, अशी अपेक्षा आहे. सेवा वितरणाच्या बाबतीत राज्यातच नाही तर देशभरात हा मंच एक नवा आदर्श निर्माण करेल, असा विश्वास मला वाटतो.

नागरिकांच्या हितासाठी राबविण्यात येणारी धोरणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील तफावत दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा आरटीएस डॅशबोर्ड हे निश्चितच एक शक्तिशाली साधन आहे. सेवा वितरणाशी संबंधित विखुरलेल्या डेटाचे कृतीयोग्य माहितीमध्ये रुपांतर करून, प्रशासनाला आणखी प्रतिसादक्षम, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यास हातभार लावणारा हा उपक्रम राज्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्या कामी पथदर्शी ठरणारा आहे.



# टीम माइलस्टोन



COMMENDATORY CERTIFICATE

The Director General of Police, State of Maharashtra records appreciation of the meritorious work done by,

MAHA IT – RTS TEAM

Had introduced security features and a Quick Response Code in Police Clearance Certificate (PCC) to prevent counterfeiting and tampering of citizens character certificates.

This initiative will helpful in increasing transparency in the administration and strengthening citizens trust in the police system.

Date :- 19 /12/2025

( Rashmi Shukla )
Director General of Police,
Maharashtra State,
Mumbai

## महाआयटी आरटीएस टीम: उत्कृष्ट सहकार्याचे फलित

महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालकांकडून प्राप्त झालेले प्रशस्तीपत्रक हे महाआयटी आरटीएस टीमच्या उल्लेखनीय कार्याचे आणि उत्कृष्ट सहकार्याचे फलित आहे. ही केवळ सन्मानाची बाब नाही, तर नवकल्पना, कार्यक्षमता आणि सार्वजनिक सेवेप्रति टीमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

उत्कृष्ट टीमवर्क हे या उपक्रमाच्या यशाचे गमक आहे. महाआयटी आरटीएस टीमने पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्रामध्ये (PCC) प्रगत सुरक्षा वैशिष्ट्ये आणि क्विक रिस्पॉन्स (QR) कोड यशस्वीपणे लागू केला. यामुळे नागरिकांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये बनावटपणा आणि छेडछाड असे गैरप्रकार रोखणे शक्य झाले. प्रशासनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून, दस्तऐवजांच्या प्रामाणिकतेचा आणि विश्वासार्हतेचा नवा मापदंड या टीमने निर्माण केला आहे.

एखाद्या व्यक्तीने मांडलेली निव्वळ नवकल्पना पुरेशी परिणामकारक नसते. ती अंमलात आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न आणि सहकार्याची भावनासुद्धा तितकीच महत्वाची असते. या कामी योगदान देणाऱ्यांचा परस्पर समन्वय, सामायिक दृष्टीकोन आणि प्रत्येक सदस्याची अखंड मेहनत निश्चितच दखलपात्र होती. महाआयटीच्या आरटीएस टीमने सामूहिक कौशल्यांचा वापर करून या उपक्रमाच्या माध्यमातून लाखो नागरिकांना उपयोगी पडणारे व्यावहारिक उपाय अंमलात आणले आहेत.

तांत्रिक यशाच्या पलिकडे जाऊन या उपक्रमाने प्रशासनातील पारदर्शकता वाढवली आहे, आणि नागरिकांचा पोलीस व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ केला आहे. सुरक्षित आणि नागरिकाभिमुख सेवा उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल शासन व्यवस्थेमध्ये असे प्रयत्न अत्यंत गरजेचे आहेत.

महाराष्ट्र पोलीस नेतृत्वाकडून मिळालेली ही कौतुकाची थाप या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. उत्कृष्ट टीमवर्क आणि तांत्रिक नवकल्पना यांच्या संगमातून सार्वजनिक सेवा वितरणात अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याचे महाआयटी आरटीएस टीमचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.

# नागरिकांचा आवाज




## नागरिक-केंद्रित प्रशासनाचे एक नवे पर्व

अहिल्यानगर जिल्ह्यातील राजू मडावी या आदिवासी शेतकऱ्याने एका स्थानिक 'सेतू केंद्रा'मार्फत जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केला, तेव्हा प्रमाणपत्र मिळण्यात विलंब होईल, किंवा कदाचित ते मिळणार सुद्धा नाही, हे त्याने गृहित धरले होते. गावातील इतर अनेकांप्रमाणेच, त्याच्याकडेही स्मार्टफोन नव्हता, आणि त्याला 'ऑनलाइन ट्रॅकिंग' प्रणालीबाबत माहिती नव्हती. मात्र अर्ज सादर केल्यानंतर काही दिवसांनी, त्याने नमूद केलेल्या मोबाइल क्रमांकावर मराठी भाषेत एक ध्वनिमुद्रित कॉल आला, आणि सेवेशी संबंधित अनुभवाचे मूल्यमापन करण्यास सांगण्यात आले. सेवा प्राप्त न झाल्यामुळे "असमाधानी" असल्याची नोंद करण्यासाठी त्याने "2" हा क्रमांक दाबला. त्यानंतर, अपेक्षित सेवेच्या संदर्भात नेमके काय चुकले किंवा काय त्रुटी आढळल्या, अशी विचारणा करण्यात आली असता, "सेवेतील विलंब" आणि "माहितीच्या अद्यतनांचा अभाव" हे पर्याय त्याने निवडले.

आपला अर्ज प्रणालीमध्ये पोहोचला आहे आणि त्याच्याशी संबंधित आपले गाऱ्हाणे ऐकून घेतले जात आहे, हा अनुभव राजू मडावीसाठी विलक्षण होता. आपली तक्रार ऐकून घेतली जाऊ शकते, हे या निमित्ताने त्याने पहिल्यांदाच अनुभवले.

एका साध्या आयव्हीआरएस (इंटरॅक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स सिस्टीम) कॉलने सर्वसामान्य नागरिकाला दिलेला हा विश्वास, प्रशासनातील एका प्रभावी बदलाचे दर्शन घडविणारा आहे. 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत नागरिकांना कालबद्ध पद्धतीने सेवा प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'आपले सरकार' या मंचाच्या माध्यमातून एक मजबूत यंत्रणा सक्रिय केली आहे. या यंत्रणेमार्फत कार्यक्षमतेने सेवा प्रदान करणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे सेवा प्राप्त करताना नागरिकांना कसा अनुभव येतो, हे समजून घेणेसुद्धा तितकेच महत्वाचे आहे. आयव्हीआरएस ही अभिप्राय यंत्रणा, या कामी मोलाची भूमिका बजावत आहे.

नागरिक-केंद्रित प्रशासनामध्ये वेळेवर आणि विश्वसनीय अभिप्राय प्राप्त करणे, हे प्रत्यक्ष सेवा देण्याइतकेच महत्त्वाचे आहे. पोर्टल, एसएमएस आणि व्हॉट्सॲपसारखे डिजिटल मंच अभिप्राय प्राप्त करण्यास मदत करत असले तरी ते इंटरनेटची उपलब्धता आणि डिजिटल साक्षरतेवर अवलंबून असतात. आयव्हीआरएस मात्र या अपवादांच्या पलिकडे जात, शहरी आणि दुर्गम, आदिवासी भागातील नागरिकांपर्यंत सारख्याच प्रभावी पद्धतीने पोहोचते आहे, आणि नागरिकांचे प्रामाणिक अभिप्राय प्राप्त करते आहे.

सेवा वितरणाच्या विविध टप्प्यांवर नागरिकांचे अनुभव जाणून घेण्यासाठी आयव्हीआरएस-आधारित अभिप्राय यंत्रणा काळजीपूर्वक तयार करण्यात आली आहे. जे अर्जदार पोर्टल पॉप-अप, एसएमएस लिंक किंवा व्हॉट्सॲप सारख्या डिजिटल माध्यमांना प्रतिसाद देत नाहीत, त्यांना आयव्हीआरएस कॉल केले जातात. नागरिकांचे प्रतिसाद जाणून घेण्यासाठी ही प्रणाली, अर्ज सादर केल्यानंतर 24 तासांच्या आत आणि पाठपुरावा करण्यासाठी 24 तासांनंतर, अशा दोन टप्प्यांवर संबंधित नागरिकांना कॉल करते.

सुलभता हे या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होय. नागरिकांना एक कॉल येतो, तो सुरू ठेवण्यासाठी त्यांना मराठी किंवा इंग्रजी भाषेचा पर्याय निवडता येतो आणि आपले प्रतिसाद नोंदविण्यासाठी प्रणालीमार्फत मार्गदर्शन केले जाते. "अत्यंत असमाधानी" ते "अत्यंत समाधानी" या श्रेणीतील पर्याय त्यांना निवडता येतो. नागरिकांनी आपल्या अनुभवानुसार पर्याय निवडल्यामुळे त्यानुसार सर्व प्राप्त अभिप्रायांचे एकत्रिकरण करून त्यांचे विश्लेषण करता येते, आणि आवश्यक सुधारणा करणे शक्य होते.

ही प्रणाली केवळ श्रेणी प्राप्त करण्यावरच थांबत नाही. एखाद्या नागरिकाने असमाधानी असल्याचा प्रतिसाद नोंदवला तर आयव्हीआरएस प्रणाली सखोल चौकशी करते. असमाधानाचे कारण शोधण्यासाठी विशिष्ट प्रश्न विचारते. याद्वारे नागरिकांना अर्ज सादर करण्यातील अडचण, दस्तावेज अपलोड करण्यातील समस्या, पेमेंट-संबंधित आव्हाने, केंद्र चालकाचे वर्तन किंवा अनधिकृत शुल्क अशा समस्या निदर्शनास आणता येतात. यंत्रणेमार्फत प्राप्त होणारा अभिप्राय केवळ संख्यात्मक नसून निदानात्मक सुद्धा असणे, ही बाब, सेवा प्रदानामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. ज्या नागरिकांना त्यांच्या समस्यांबद्दल अधिक तपशीलवार माहिती

द्यायची आहे, ते सिटीझन केअर एक्झिक्युटिव्हकडून कॉल बॅकची विनंती करू शकतात. अर्थात, ज्या नागरिकांना, यंत्रणेमार्फत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्या फोनवरून नोंदवता येत नाहीत, किंवा मानवी हस्तक्षेप आवश्यक वाटतो, त्यांना तशी सोय उपलब्ध करून दिली जाते आणि नागरिकांच्या समस्यांचे निराकरण केले जाते.

सेवा वितरणाच्या विविध माध्यमांची समावेशकता, हे या प्रणालीचे आणखी एक वैशिष्ट्य. नागरिकांनी 'आपले सरकार पोर्टल'वरून ऑनलाइन अर्ज केलेला असो किंवा आपले सरकार सेवा केंद्र /सेतू केंद्रातून अर्ज केलेला असो, ही अभिप्राय प्रणाली अशा सर्व अर्जदारांसाठी उपलब्ध आहे. नागरिक आणि शासकीय सेवा यांच्यातील प्राथमिक संपर्क म्हणून स्थानिक सेवा केंद्रे कार्यरत आहेत, अशा ठिकाणी ही प्रणाली जास्त महत्त्वाची ठरते.

प्राप्त अभिप्रायाचा वापर कसा केला जातो, हा या प्रक्रियेतील सर्वात महत्वाचा भाग आहे. आयव्हीआरएस आणि इतर माध्यमांद्वारे प्राप्त अभिप्राय एका मध्यवर्ती प्रणालीमध्ये एकत्रित केले जातात. समस्यांची वारंवारिता, अर्जाच्या कार्यान्वियनातील अडथळे आणि सेवा प्रदान प्रक्रियेतील उणिवा समजून घेण्यासाठी या माहितीचे विश्लेषण केले जाते. उदाहरणार्थ, विलंबाबद्दलच्या तक्रारी लक्षात घेत, विलंबाची कारणे जाणून घेऊन, त्यांचे निराकरण करता येते, तसेच अवास्तव शुल्क वसुलीच्या तक्रारी लक्षात घेत संबंधित केंद्रांवर अधिक कठोर देखरेख करण्याच्या उपाययोजना करता येतात.

या प्रणालीद्वारे प्राप्त होणारा अभिप्राय केवळ निरीक्षणापुरता मर्यादित नाही तर त्याद्वारे परिवर्तन अपेक्षित आहे. सेवा, विभाग, जिल्हे आणि सेवा केंद्रांसह अनेक स्तरांवर हे अभिप्राय प्राप्त केले जातात आणि त्यांचे वर्गीकरण करून 'नागरिक लाभार्थी गुणां'ची गणना केली जाते. पोर्टल अथवा केंद्रामार्फत प्रदान केलेल्या सेवांच्या संख्येबरोबरच, सेवा प्राप्त करण्याच्या प्रक्रियेत नागरिकांच्या अभिप्रायाचीही दखल घेतली जात असल्यामुळे प्रशासकीय पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढीस लागली आहे.

या यंत्रणेतील अभिप्रायांमार्फत प्राप्त 'नागरिक लाभार्थी गुण' हे एकूण 'आपले सरकार पोर्टल गुणां'च्या 30 टक्के असतील, आणि ते वरिष्ठ स्तरासाठी उपलब्ध डॅशबोर्डवर प्रदर्शित केले जातील. अर्थात नागरिकांचा अभिप्राय हा केवळ निष्क्रिय घटक राहिलेला नाही, तर सर्वोच्च स्तरावरील निर्णय प्रक्रिया प्रभावित करणारा तो एक महत्त्वाचा प्रशासकीय मापदंड ठरला आहे.

डिजिटल उपलब्धता आणि साक्षरतेच्या बाबतीत विषमता कायम असणाऱ्या आपल्या महाराष्ट्र राज्यात आयव्हीआरएस प्रणाली, या दोन्ही वर्गांना एकत्र करणारे माध्यम म्हणून काम करते आहे. ही प्रणाली नागरिकांच्या वेळेचा, भाषेचा आणि तांत्रिक सोयीचा आदर करणारी आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक नागरिकाचा अभिप्राय महत्त्वाचा आहे, या सुशासनाच्या मूलभूत तत्त्वाला बळकटी देणारी ही यंत्रणा आहे.

राजू मडावी यांचा अनुभव ही केवळ अभिप्रायाची कहाणी नाही, ही सक्षमीकरणाची गाथा आहे. एका साध्या फोन कॉलच्या माध्यमातून ते अशा प्रणालीचा भाग बनले, जी त्यांच्या मताचा आदर करते, समजून घेते आणि सुधारणाही करते. शासन म्हणजे केवळ सेवा प्रदान करणे नाही तर अभिप्राय जाणून घेत प्रणालीत आवश्यक बदल करणे, हेच खरे सुशासन आहे, हे अधोरेखित करणारी ही प्रणाली आहे.



# माणुसकीचा हात



वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक आधार सेवा पुरवून सशक्तीकरणाचे उत्कृष्ट उदाहरण ठरलेल्या सानिका संदीप राणे



## वैद्यकीय अडचणीच्या वेळी रुग्णालयापर्यंत पोहोचली आधार सेवा

रत्नागिरी जिल्ह्यातील काही भाग खूप दुर्गम आहेत. अशा ठिकाणी आजारी असलेल्या किंवा अपघात झालेल्या व्यक्तींना आवश्यक सरकारी सेवा मिळवणे कठीण जाते. चिपळूण तालुक्यामधील सावर्डे या अशाच दुर्गम ठिकाणी सानिका संदीप राणे या नवउद्योजक महिलेने माणुसकीचा आणि सेवाभावाचा अनोखा आदर्श घालून दिला आहे. ग्रामीण भागात निर्धारपूर्वक कार्य करणाऱ्या, माणुसकी जपणाऱ्या महिलेची ही कथा आहे.

23 एप्रिल 2026 रोजी सानिका राणे आपल्या आधार सेवा केंद्रात काम करत होत्या. नेहमीची कामे सुरु होती. मात्र काही वेळातच सुजय संजय शिंदे नावाचा युवक रडवेल्या अवस्थेत घाईघाईत केंद्रात आला. आपले वडील संजय संभाजी शिंदे हे घराच्या छतावरून पडून गंभीर जखमी झाल्याचे त्याने सांगितले. या अपघातात त्यांच्या मानेला आणि पाठीला फ्रॅक्चर झाले होते आणि शस्त्रक्रिया करून त्यांच्या पाठीमध्ये प्लेट बसवण्यात आली होती. संजय शिंदे यांना वालावलकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती गंभीर होती, आणि त्यांना हलवू नये, असा सल्ला डॉक्टरांनी दिला होता.

आपल्या वडिलांच्या उपचाराचा खर्च कसा करावा, हा प्रश्न सुजय शिंदे यांच्यासमोर होता. आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेऊन उपचाराची सोय करणे शक्य होते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड अद्ययावत असणे आवश्यक होते. मात्र त्यासाठी रुग्णाला आधार केंद्रात आणणे शक्य नव्हते. रुग्णालयात दाखल असलेल्या आणि हालचाल करु न शकणाऱ्या रुग्णासाठी हे मोठेच संकट होते.

ही परिस्थिती पाहून सानिका राणे यांनी त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला. जिल्हा व्यवस्थापक मयूर आयरे आणि प्रतीक पेटकर यांच्याशी त्यांनी संपर्क साधला, आणि प्राप्त परिस्थितीत घरपोच आधार सेवेबाबत मार्गदर्शन मागितले. प्रशासनाकडून त्वरित सहकार्य आणि मार्गदर्शन मिळाल्यानंतर सानिका यांनी आवश्यक सेवा थेट रुग्णापर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला.

सानिका राणे आपला आधार संच घेऊन वालावलकर रुग्णालयात गेल्या. त्यांनी रुग्णाजवळ जाऊन आधार अदयतनाची प्रक्रिया पूर्ण केली. उपस्थित डॉक्टर आणि नर्स यांनी त्यांना पूर्ण सहकार्य केले. त्यामुळे बायोमेट्रिक आणि कागदपत्रांची प्रक्रिया व्यवस्थित पार पडली.

परिस्थिती बिकट असतानाही सानिका राणे यांनी आपले काम यशस्वीरित्या पूर्ण केले, परिणामी रुग्णाला आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेणे शक्य झाले. रुग्णाच्या गंभीर अवस्थेमुळे बायोमेट्रिक प्रक्रिया पूर्ण करणे सोपे नव्हते. मात्र सानिका राणे यांनी संयमाने आणि कौशल्याने सर्व प्रक्रिया पूर्ण केली.

या सेवेकरिता शासनाच्या नियमांनुसार ₹700 इतके नाममात्र शुल्क घेण्यात आले. मात्र, या सेवेचे खरे मोल पैशात मोजता येणार नाही, कारण या एका कृतीमुळे शिंदे कुटुंबाला वेळेत आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळू शकला आणि रुग्णाच्या उपचाराची प्रक्रिया सुलभ झाली.

ही घटना केवळ आधार तपशील अद्ययावत करण्यापुरती मर्यादित नाही, तर ती माणुसकी, संवेदनशीलता आणि उत्तरदायित्वाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. डिजिटल सेवा म्हणजे केवळ तंत्रज्ञान नाही तर ते समाजासाठी उपयोगी पडणारे प्रभावी साधन आहे, हे सानिका राणे यांनी आपल्या वर्तनातून दाखवून दिले आहे.

खरे सक्षमीकरण तंत्रज्ञानात नसून, त्याच्या माणुसकीपूर्ण वापरात आहे, हा महत्त्वाचा संदेश सानिका राणे यांची कृती देते. त्यांच्या कामामुळे शासन व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक मजबूत झाला आहे आणि नागरिकांना योग्य वेळी मदतही मिळाली आहे.

महाआयटीचा असा सक्रिय सहभाग ग्रामीण भारताच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या उदाहरणातील महिला या केवळ उद्योजक नाहीत, तर त्या परिवर्तनाच्या अर्ध्वयू आहेत. महिला पुढाकार घेतात, तेव्हा सकारात्मक बदल निश्चितपणे घडतो, हे या उदाहरणावरुन पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# डिजिटल-सक्षम ग्रामीण महाराष्ट्र




## नाशिकमधल्या दुर्गम गावात डिजिटल क्रांतीची पावले

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा 'कुसुमाग्रज' यांचे मूळ गाव अशी ओळख असणारे नाशिक जिल्ह्यातील शिरवाडे (वणी) हे गाव, डिजिटल क्रांतीच्या चाहुलीने सुखावले आहे. तब्बल एक दशकापेक्षा जास्त काळापासून 'आपले सरकार' सेवा केंद्राच्या माध्यमातून शासकीय सेवांचे लाभ डिजिटल पद्धतीने ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचवणारे श्री. सतीश दौलत काळे हे या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहेत.

भारतात तळागाळापर्यंत इंटरनेटचा प्रसार होत असताना 2012 साली या गावात 'महा ई-सेवा केंद्र' सुरू करून सतिश काळे यांनी एक क्रांतिकारी पाऊल उचलले. त्यांच्याच माध्यमातून गावातील नागरिकांची डिजिटल पद्धतीने प्राप्त होणाऱ्या शासकीय सेवांशी तोंडओळख झाली. एका लहानशा उपक्रमापासून सुरू झालेली ही वाटचाल लवकरच शासकीय सेवा मिळवून देणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या केंद्रापर्यंत पोहोचली. या केंद्राने नागरिक आणि प्रशासन यांच्यातील उपयुक्त दुवा म्हणून काम करायला सुरुवात केली.

महाराष्ट्र शासन आणि महाआयटीच्या सहकार्याने या केंद्राने विविध प्रकारच्या शासकीय सेवा पुरवण्यास सुरुवात केली. यामध्ये आधार नोंदणी व अद्यतनीकरण, महसूल विभागाची प्रमाणपत्रे आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे यांसारख्या सेवांचा समावेश होता. विशेष म्हणजे, या केंद्राचा प्रभाव केवळ शिरवाडे गावापुरता मर्यादित राहिला नाही, तर आसपासच्या 10 ते 12 गावांमधील नागरिकांनाही या केंद्राचा लाभ मिळाला, आणि हे केंद्र एक महत्त्वपूर्ण प्रादेशिक डिजिटल केंद्र म्हणून नावारूपाला आले.

या केंद्राचे लाभार्थी असणारे श्री. गणपत शिंदे हे जवळच्या गावातले 68 वर्षीय शेतकरी. प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी पूर्वी त्यांना तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या कार्यालयात जाण्यासाठी 20 ते 25 किलोमीटर प्रवास करावा लागत असे. अनेकदा फेऱ्याही माराव्या लागत, आणि त्यामुळे त्यांच्या रोजच्या मजुरीचेही नुकसान होत असे. या केंद्रामुळे आज अशा सर्व सेवा त्यांना आपल्या गावातच उपलब्ध झाल्या आहेत. नुकतेच त्यांनी या केंद्रावर एकाच भेटीत आपले आधार कार्ड अद्ययावत करून घेतले आणि एका शासकीय योजनेसाठी अर्जही केला. "आता आपल्या गावातच सर्व काही उपलब्ध झाले आहे," असे ते म्हणतात. त्यांच्या या उद्गारांतून, या केंद्रांची उपयुक्तता अधोरेखित होते.

हे केंद्र सुरू होण्यापूर्वी, अशा प्रकारच्या सेवा मिळवणे हे वेळखाऊ आणि शारीरिकदृष्ट्या कष्टप्रद काम होते. वृद्ध नागरिक, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी तर हे काम जास्त कठीण होते. आपले सरकार सेवा केंद्राने हे सर्व अडथळे दूर केले असून, अत्यावश्यक सेवा नागरिकांच्या अगदी जवळ उपलब्ध होतील, याची खात्री केली आहे.

गेल्या 14 ते 15 वर्षांच्या कालावधीत, या केंद्राने सेवा वितरणाची गुणवत्ता सुधारली, आणि त्याचबरोबर ग्रामीण नागरिकांमध्ये डिजिटल साक्षरता आणि आत्मविश्वास वाढवण्याचे मोलाचे कामही केले आहे. हे केंद्र नागरिकांना शासकीय योजनांचे लाभ स्वतंत्रपणे आणि पूर्ण पारदर्शकतेने मिळवण्यासाठी सक्षम करते आहे, त्यामुळे मध्यस्थांवरील त्यांचे अवलंबित्व कमी झाले आहे. केंद्रचालक श्री. सतीश काळे यांच्यासाठी सुद्धा हा प्रवास तितकाच महत्वाचा ठरला असून, यातून त्यांना व्यावसायिक प्रगती आणि समाजात आदर, अशा दोन्ही गोष्टी प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल पायाभूत सुविधा आणि तळागाळातील उद्योजकता यांचा मेळ घालून, सर्वसमावेशक विकास कसा साधता येतो, आणि ग्रामीण भारताला खऱ्या अर्थाने कसे सक्षम करता येते, याची साक्ष देणारी अशी अनेक आपले सरकार सेवा केंद्रे आज समर्थपणे शासकीय सेवा प्रदान करण्याचे काम अतिशय प्रामाणिकपणे करत आहेत.

# जिद्द, साथ आणि सेवा



## सेवा केंद्रांच्या माध्यमातून घडले परिवर्तन: बोंगाणे दाम्पत्याच्या जिद्दीची कहाणी

हिंगोली जिल्ह्यातील उमरा हे साधे, शांत, आपल्या मातीचा गंध जपणारे गाव... या गावातल्या पायवाटांवरून चालताना आयुष्याच्या असंख्य कथा आपल्याला भेटतात, त्यापैकी काही काही संघर्षाने भरलेल्या आणि काही प्रेरणा देणाऱ्या. अशाच एका साध्या कुटुंबातून उभ्या राहिलेल्या, अनेकांसाठी मार्गदर्शक ठरलेल्या रामकिशन बोंगाणे आणि त्यांची पत्नी संगिता बोंगाणे या दाम्पत्याची गोष्ट जाणून घेऊयात.

रामकिशन बोंगाणे यांनी बी.ए. (राज्यशास्त्र) पर्यंत शिक्षण घेतले आहे. घरची परिस्थिती बेताची. मोठे कुटुंब, मर्यादित उत्पन्न आणि भविष्यातील अनिश्चितता, अशा परिस्थितीत पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर इतरांप्रमाणे त्यांनीही नोकरी मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. परंतु गावाच्या जवळ नोकरी मिळत नव्हती, निराशा वाढत चालली होती. शेवटी त्यांनी वास्तवाचा स्वीकार केला, आणि घरची शेती सांभाळण्याचा निर्णय घेतला.

2009 ते 2010 दरम्यान त्यांनी स्वतःला पूर्णपणे शेतीत झोकून दिले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतात कष्ट, पावसाच्या लहरींवर अवलंबून असलेली पीके आणि त्यातून मिळणारे अनिश्चित उत्पन्न, हे सर्व त्यांनी अनुभवले. मात्र बदलत्या हवामानामुळे उत्पादन घटत गेले. कधी पाऊस कमी, कधी जास्त; कधी रोगराई, तर कधी बाजारभावात चढउतार. मेहनत तितकीच, पण त्याचा मोबदला अपुरा. हळूहळू कर्जाचे ओझे वाढू लागले. घराच्या अर्थकारणावर त्याचा परिणाम दिसू लागला.

या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी काहीतरी वेगळे करण्याची गरज त्यांना जाणवू लागली. शेतीपुरते आयुष्य मर्यादित ठेवायचे नाही, असा निश्चय त्यांनी केला. शिरडजवळ एका छोट्याशा जागेत त्यांनी सिम कार्ड आणि मोबाईल पार्ट्स विक्रीचे दुकान सुरू केले. दुकान मोठे नव्हते. मागेच कच्चे घर. साधी परिस्थिती. ग्राहक येत होते, संवाद वाढत होता, पण व्यवसाय मात्र अपेक्षेइतका वाढत नव्हता.

या काळात कुटुंबातील काहींना वाटू लागलं की रामकिशन चुकीच्या दिशेने चालले आहेत. "शेती सोडून हे काय नवीन?" असा प्रश्न उपस्थित होऊ लागला. पाठिंबा कमी होता. पण याच वेळी त्यांच्या आयुष्यात सर्वात महत्त्वाचा आधार ठरल्या त्यांच्या पत्नी संगिता बोंगाणे.

संगिता यांनी परिस्थितीला नकार देण्याऐवजी ती स्वीकारली. त्यांनी पतीच्या निर्णयावर विश्वास ठेवला. "तुम्ही पुढे चला, मी आहे तुमच्या सोबत," हा त्यांचा ठाम विश्वास रामकिशन यांना नव्या उमेदीने उभे राहण्यासाठी मदत करणारा ठरला. त्या काळात दोघेही कच्च्या घरात राहत होते. साधेपणाने जगत होते. मात्र त्यांच्या मनातले स्वप्न मोठे होते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठीची जिद्द होती, आणि मेहनतनतीची तयारीही होती.

2012 हे वर्ष त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे ठरले. त्यांनी 'महा-ई सेवा





सेतू' केंद्र मिळण्यासाठी प्रयत्न केले आणि केंद्र सुरु केले. त्या काळात सेवा आणि योजना अशा केंद्राद्वारे मिळण्याची संकल्पना ग्रामीण भागात नवीन होती. नागरिकांना या केंद्राबद्दल फारशी माहिती नव्हती. "हे काय असते?", "आपल्याला काय फायदा?" असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनात होते.

या सगळ्याला उत्तर देणे, त्यांना या केंद्राद्वारे सेवा व योजना घेण्यास प्रवृत्त करणे, त्यांना मार्गदर्शन करणे हे बोंगाणे दाम्पत्यासमोर मोठे आव्हान होते. केवळ सेवा पुरवणे पुरेसे नव्हते, तर जनजागृती करणे आवश्यक आहे, हे या दाम्पत्याने ओळखले. त्यांनी संपूर्ण परिसरात जाऊन लोकांना समजावून सांगायला सुरुवात केली. या सेवा आणि योजना मिळवण्यासाठीची प्रक्रिया सांगितली, छोट्या प्रमाणात शिबिरे घेऊन, माहिती देऊन मार्गदर्शन केले.

त्या वेळी सर्व प्रक्रिया ऑनलाईन नव्हत्या. एका कामासाठी तहसील कार्यालय, जिल्हा कार्यालय अशा अनेक ठिकाणी फेऱ्या माराव्या लागत. ग्राहकाची कागदपत्रे गोळा करून त्यांचा पाठपुरावा करणे हेच त्यांच्या दैनंदिन कामाचे स्वरूप होते. एका अर्जासाठी आठवडा, कधी पंधरा दिवस, तर कधी महिनाही लागत होता. काम पूर्ण होईपर्यंत ग्राहक आणि सेवा देणाऱ्या दोघांनाही संयम ठेवावा लागत असे.

या प्रक्रियेत प्रचंड वेळ, श्रम आणि खर्च होत असे. तरीही त्यातून मिळणारा मोबदला फारसा समाधानकारक नव्हता. पण या दाम्पत्याने हार मानली नाही. सातत्य ठेवले. लोकांशी संवाद वाढवला. त्यांच्या अडचणी समजून घेत; त्या दूर करण्यासाठी सर्वोतोपरी पयत्न करत राहिले.

पुढे 2015 पासून परिस्थितीत बदल घडू लागला. शासकीय सेवा हळूहळू ऑनलाईन होत गेल्या. प्रक्रिया सुलभ झाली. वेळ वाचू लागला. नागरिकांना एका ठिकाणी अनेक सेवा उपलब्ध होऊ लागल्या. बोंगाणे दाम्पत्यासाठी ही मोठी संधी होती. त्यांनी या बदलाचा योग्य उपयोग करून घेतला.

त्यांनी शाळांमध्ये, गावांमध्ये मोठ्या प्रमाणात शिबिरे घेण्यास सुरुवात केली. अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न केला. त्यांचे केंद्र सकाळी 7 वाजता सुरु होऊ लागले आणि संध्याकाळी 6 पर्यंत चालू राहू लागले. घर मागेच असल्यामुळे गरज पडल्यास अवेळीही ते ग्राहकांची मदत करू लागले.

या प्रवासात संगिता बोंगाणे यांनी स्वतःमध्ये मोठा बदल घडवून आणला. गावाकडे चूल-मुल सांभाळणे एवढेच एका स्त्रीचे काम अशी धारणा असलेल्या ठिकाणी त्यांनी पदर खोचून सेवा केंद्र चालवायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांना या कामाचे दडपण जाणवत होते. परिसरातील नागरिकांनी नावे ठेवली, संगिता यांच्याकडून सेवा घेण्यास टाळाटाळ केली, कुटुंबियांनीही नाराजी व्यक्त केली. आजूबाजूचे रहिवासी त्यांना तुच्छतेने वागवू लागले. हे सर्व असूनही बोंगाणे दाम्पत्य मागे हटले नाहीत, त्यांनी या सामाजिक स्थितीचा मोठ्या हिंमतीने सामना केला.

संगिता यांनी केंद्राच्या कामाची एकेक गोष्ट शिकत स्वतःला सक्षम बनवले, यात त्यांना त्यांचे पती रामकिशन यांची मोलाची साथ लाभली. आज त्या आधार केंद्राचे पूर्ण काम आत्मविश्वासाने सांभाळत आहेत. पती नसताना संपूर्ण केंद्र चालवण्याची जबाबदारी त्या एकट्याने निभावतात. तसेच गावातील महिला, मुले हक्काने संगिता ताईंकडे सेवा मिळवण्यासाठी येतात. यामुळे परिसरातील महिलाही आत्मविश्वासाने केंद्रावर येतात, न लाजता, न घाबरता आपले काम करतात. या केंद्रावर स्वच्छता गृहाची सोय असल्यामुळेही आजूबाजुच्या गावातीलही महिला निर्धास्तपणे केंद्रावर कामासाठी येतात.

या केंद्रात येणारे नागरिक हळूहळू त्यांच्या कुटुंबाचा भाग बनू लागले आहेत. नुकतेच एका वृद्ध शेतकऱ्याने 'प्रधानमंत्री किसान मानधन योजने'करिता बोंगाणे यांच्या कॉमन सर्विस सेंटरला भेट दिली. या योजनेची नोंदणी करण्यासाठी कागदपत्रे अपुरी पडत होती आणि प्रक्रियाही गुंतागुंतीची होती. बोंगाणे दाम्पत्याच्या कौशल्यामुळे आणि माहिती असल्यामुळे त्यांनी त्यांची कागदपत्रे त्यांच्या मुलांकडून घेत, सर्व नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण केली आणि पुढच्याच महिन्यात शेतकरी आनंदाने पेढे घेऊन केंद्रावर आले. त्यांना मासिक मानधन सुरु झाले होते. त्याच्या डोळ्यांतील आनंदाश्रू पाहून बोंगाणे दाम्पत्याला समाधान वाटले.

अशा अनेक लहानमोठ्या घटनांमधून त्यांचे काम फक्त व्यवसाय न राहता एक सामाजिक जबाबदारी बनत गेले. नागरिकांचा विश्वास वाढत गेला. आता रहिवासी त्यांच्याकडे सल्ला घेण्यासाठी, कौटुंबिक किंवा परिसरातील समस्या सोडवण्यासाठी सुद्धा येतात.

आजही अनेक कामांची पूर्ती करण्यासाठी तलाठी तसेच जिल्हा कार्यालयातून कागदपत्रांवर शिक्कामोर्तब होणे आवश्यक असते. या कामातही दिरंगाई होऊ नये, यासाठी बोंगाणे यांनी संवाद फलक बनवला आहे, जेणेकरून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध सेवा सुलभ मिळाव्यात. या त्यांच्या परिश्रमामुळेच केंद्राला सकारात्मक ओळख मिळाली आहे.

एकेकाळी 'नुकसान होईल' असे म्हणणारे नातेवाईक आज

अभिमानाने त्यांच्या यशाबद्दल बोलत आहेत. त्यांनी या केंद्राद्वारे होणाऱ्या व्यवसायाच्या कमाईवर पक्के दुकान उभारले. स्वतःचे घर बांधले. गावाकडील कुटुंबाला आर्थिक आधार दिला. त्यांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरात पाठवले. हे सुखी आणि समाधानी आयुष्य मिळाल्याने बोंगाणे दाम्पत्य आनंदी आहेत. आपण आपले सरकार सेवा केंद्र आणि कॉमन सर्विस सेंटरचे ऋणी असल्याचे ते सांगतात. "सरकारने लोकांच्या लाभासाठी अशी केंद्रे सुरु केल्यामुळेच आम्हाला व्यवसाय करता आला, यासाठी आम्ही सरकारचे आभार मानतो. सरकारने आम्हाला रोजगार दिला, व्यवसाय दिला, आमच्या पायावर उभे केले," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या संपूर्ण प्रवासात एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते, ती म्हणजे, डिजिटल सेवांचा खरा अर्थ केवळ तंत्रज्ञानात नसून, त्या सेवा नागरिकांपर्यंत पोहोचण्यात आहे. बोंगाणे दाम्पत्य हे काम मनापासून करते आहे. आज त्यांचे केंद्र हे केवळ सेवा देणारे ठिकाण नाही, तर नागरिकांसाठी विश्वासाचे केंद्र बनले आहे. लोक तिथे केवळ कामासाठी नाही, तर मार्गदर्शनासाठीही येतात.

रामकिशन बोंगाणे म्हणतात, "आमच्याकडे येणारा प्रत्येक माणूस आशा घेऊन येतो. त्याचे काम झाले की त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून आम्हाला समाधान मिळते." या एका वाक्यात त्यांच्या कामाचे सार दडलेले आहे.

उमरा गावातील साध्या कुटुंबाचा हा प्रवास त्यांना स्थैर्य, समाधान आणि सामाजिक मान्यता मिळवून देणारा ठरला आहे. कच्च्या घरातून सुरु झालेली त्यांची वाटचाल आज पक्क्या घरापर्यंत आणि संघर्षापासून समाधानापर्यंत पोहोचली आहे.

ही कथा केवळ एका दाम्पत्याची नाही, तर ग्रामीण भागात डिजिटल सेवांच्या माध्यमातून घडत असलेल्या सकारात्मक बदलाची आहे. सातत्य, परिश्रम आणि परस्परांवरील विश्वास यांच्या बळावर कोणतेही स्वप्न साकार होऊ शकते, याचे हे जिवंत उदाहरण आहे.

परिस्थिती कितीही कठीण असली तरी योग्य दिशेने घेतलेला छोटासा निर्णयही आयुष्य बदलू शकतो आणि त्या निर्णयाला साथ देणारा विश्वास असेल, तर यश दूर राहत नाही, असा मोलाचा धडा, रामकिशन आणि संगिता बोंगाणे यांच्या प्रवासातून मिळतो.



# महाआयटीमुळे राहुरीत नागरिक सेवांचे प्रभावी परिवर्तन

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी या गजबजलेल्या शहरातील 'आपले सरकार सेवा केंद्र' चालकाने नागरिकांना शासकीय सेवा मिळवून देण्याची पद्धतच बदलली आहे. राहुरी बी.के. येथील नगरपालिकेच्या पार्किंग परिसरात कार्यरत असलेले संजय ईश्वर बंचारे हे शासन आणि स्थानिक नागरिक यांच्यातील विश्वासार्ह दुवा ठरले आहेत.

बंचारे चालवत असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रामार्फत (ASSK) पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, पासपोर्ट सेवा, राजपत्र (गॅझेट) सेवा, शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच पोलीस चारित्र्य प्रमाणपत्र अशा विविध महत्त्वाच्या सेवा नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जातात. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे केंद्र एकाच ठिकाणी सर्व सेवा मिळवून देणारे प्रभावी केंद्र ठरले आहे. त्यामुळे वेळ, पैसा आणि दूरवरच्या प्रवासाचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. याच केंद्राचा लाभ घेणाऱ्यांपैकी रोहित विलास जाधव हा जवळच्या गावातील एक तरुण आहे. खासगी क्षेत्रातील नोकरीसाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे तो अडचणीत सापडला होता. त्याच्या आधार कार्डमध्ये काही त्रुटी होत्या आणि त्याच्याकडे वैध पोलीस चारित्र्य प्रमाणपत्र तसेच पॅन कार्ड नव्हते. ही दोन्ही कागदपत्रे नोकरीसाठी अत्यावश्यक होती.

अर्जाची अंतिम मुदत जवळ येत असल्याने रोहित मोठ्या चिंतेत बंचारे यांच्या आपले सरकार सेवा केंद्रात आला. परिस्थितीचे गांभीर्य आणि निकड ओळखून बंचारे यांनी तत्काळ रोहितच्या आधार कार्डातील दुरुस्तीची प्रक्रिया सुरू केली. तसेच पॅन कार्ड आणि पोलीस पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची संपूर्ण प्रक्रिया त्याला समजावून सांगितली. सर्व औपचारिकता वेळेत पूर्ण करून त्यांनी प्रत्येक टप्प्यावर रोहितला आवश्यक माहिती दिली.

अल्पावधीतच रोहितला सर्व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाली आणि त्याने यशस्वीपणे नोकरीसाठी अर्ज पूर्ण केला. त्या कंपनीत रोहितची निवड झाली आणि त्याला नोकरी मिळाली. या नोकरीने केवळ त्याच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळाले नाही, तर त्याच्या आत्मविश्वासालाही नवी उभारी मिळाली.

रोहितसारख्या अनेक व्यक्ती अन् घटना संजय बंचारे यांच्या केंद्रात सातत्याने घडत असतात. त्यांची तत्परता, कार्यक्षमता आणि नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून केलेली सेवा यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी मोठा विश्वास निर्माण झाला आहे. प्रक्रिया पारदर्शक ठेवणे, स्पष्ट मार्गदर्शन करणे आणि गरजूंसाठी अपेक्षेपेक्षा अधिक प्रयत्न करणे, ही त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये आहेत. विशेषतः विद्यार्थी, नोकरीच्या शोधात असलेले युवक, ज्येष्ठ नागरिक आणि रोजंदारीवर काम करणारे कामगार यांना त्यांच्या सेवेमुळे मोठा दिलासा मिळतो.




***ग्राहकांचे समाधान हीच संजय ईश्वर बंचारे यांच्या सेवेची खरी ओळख आहे.***

डिजिटल प्रशासनाचा विस्तार झपाट्याने होत असताना संजय ईश्वर बंचारे यांच्यासारखे तळागाळातील सेवा पुरवठादार अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. शासनाच्या सेवा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम ते प्रभावीपणे करत आहेत. बंचारे यांचे कार्य म्हणजे नागरिकांना सुलभरित्या, कार्यक्षम पद्धतीने विश्वासार्ह डिजिटल सेवा उपलब्ध करून देत त्यांना सक्षम करणे, या महाआयटीच्या मूलभूत ध्येयाचे उत्तम उदाहरण आहे.

समर्पण, संवेदनशीलता आणि सेवाभाव यांच्या बळावर संजय आज केवळ सेवा देत नाहीत, तर शासन अधिक सर्वसमावेशक आणि नागरिकाभिमुख बनवत आहेत.

# प्रशासन पोहोचले घरोघरी



काश्टी, श्रीगोंदा तालुका

## सक्षम प्रशासन, सक्षम नागरिक: समाधान शिबिरे

महाराष्ट्राच्या लातूर जिल्ह्यातील दुर्गम गावांमध्ये आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या काही भागांमध्ये आता नागरिकांना शासकीय सेवा प्रभावी पद्धतीने मिळू लागल्या आहेत. एकेकाळी शासकीय कार्यालयांमध्ये जाणे म्हणजे लांबच लांब रांगा लावणे, असे समीकरण होते, आता मात्र हे चित्र बदलते आहे. नागरिकांना शासकीय सेवा घरपोच देणारे "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान" हे प्रतिसादात्मक प्रशासनाचे आदर्श प्रतीक म्हणून मान्यता पावते आहे.

किल्लारी, हाडोल्टी, नालेगाव, कासार बाळकुंडा अशा गावांमध्ये, आणि अहिल्यानगरच्या आदिवासी भागांमध्ये भरवण्यात येणारी ही शिबिरे, केवळ सेवा वितरण करणारे मंच नाहीत, तर ती विश्वासाची, सक्षमीकरणाची आणि तळागाळापर्यंत पोहोचणाऱ्या प्रशासनाची केंद्रे ठरत आहेत.

ग्रामीण नागरिकांना, विशेषतः शेतकरी, महिला आणि आदिवासी समुदायांना उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र किंवा जमिनीच्या नोंदीसारखी मूलभूत कागदपत्रे मिळवण्यासाठी मोठे कष्ट करावे लागत होते. अनेकदा लांबचा प्रवास करणे, शासकीय कार्यालयांमध्ये फेऱ्या मारणे, त्यासाठी दिवसाची मजुरी गमावणे अशा समस्यांमुळे नागरिक मेटाकुटीला येत असत.

समाधान शिबिराने मात्र हे चित्रच बदलून टाकले.

नागरिकांनी व्यवस्थेकडे पाठपुरावा करण्याऐवजी या शिबिरांच्या माध्यमातून आता व्यवस्थाच डिजिटल स्वरूपात पूर्णपणे सुसज्ज होऊन नागरिकांपर्यंत पोहोचते आहे. अनेक विभाग एकाच छताखाली कार्यरत असल्याने, अखंड सेवा वितरण आणि समस्यांचे तात्काळ निराकरण सुद्धा सुनिश्चित होते आहे.

### प्रत्यक्ष परिणाम

या शिबिरांमधून समोर येणारी आकडेवारी पुरेशी बोलकी आहे:

- कासार बाळकुंडा येथील एकाच शिबिरात 400 पेक्षा जास्त प्रमाणपत्रांचे वितरण
- लातूरमधील शिबिरांमध्ये 1,000 पेक्षा जास्त दस्तावेज जारी करण्यात आले
- एकाच ठिकाणी हजारो अर्जांवर प्रक्रिया करण्यात आली, त्यांची पडताळणी करण्यात आली आणि समस्यांचे निराकरण करण्यात आले

शिबिरांमध्ये प्रदान करण्यात आलेल्या सेवांमध्ये उत्पन्न, जात आणि रहिवास प्रमाणपत्रे, डिजिटल 7/12 उतारे, आधार अद्यतन, पीएम किसान सुविधा आणि योजनांविषयी जनजागृती यांचा समावेश आहे. मात्र या आकड्यांच्या पलीकडे पाहिले तर नागरिकांच्या अनुभवांमध्ये झालेला बदल जास्त परिणामकारक आहे.

### प्रत्यक्ष अनुभव

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या एका लहान गावातील विधवा सुशीला ताई, आपल्या मुलीच्या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी महिनोनमहिने प्रयत्न करत होत्या. तहसील कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्यामुळे त्यांना रोजच्या मजुरीवर पाणी सोडावे लागत होते, आणि प्रवासाचा खर्चही होत होता. त्यांच्या गावात आयोजित केलेल्या समाधान शिबिरात, त्यांच्या अर्जावर डिजिटल पद्धतीने प्रक्रिया करण्यात आली, त्याची पडताळणी झाली आणि काही तासांतच त्यांना प्रमाणपत्र जारी करण्यात आले.

सुशीला ताईंसाठी ते प्रमाणपत्र केवळ एक दस्तऐवज नव्हते, तर त्यामुळे त्यांच्या मुलीचे भवितव्य विनासायास सुरक्षित झाले होते.

अहिल्यानगरमधले बापूराव भिल या आदिवासी लाभार्थींचा अनुभव सुद्धा बोलका आहे. अकोले तालुक्याच्या बाहेर एका आदिवासी वस्तीत राहणारे बापूराव भिल यांनी कधीही थेट औपचारिक शासकीय सेवांचा लाभ घेतला नव्हता. कागदपत्रांच्या अभावामुळे ते कृषी योजनांअंतर्गत मिळणाऱ्या लाभांपासून वंचित राहिले होते.

समाधान शिबिरात, अधिकाऱ्यांनी त्यांना एकाच भेटीत जात प्रमाणपत्र, आधार अद्यतन, आणि पीएम किसान नोंदणी अशा सेवांचे लाभ मिळवून दिले. या अनुभवामुळे बापूराव यांना पहिल्यांदाच व्यवस्थेचा भाग असल्यासारखे वाटले. "पहिल्यांदाच सरकारी लोक आमच्यापर्यंत आले", ही त्यांची प्रतिक्रिया प्रातिनिधीक आहे.

लातूरचे काशिनाथ जाधव या शेतकऱ्यानेही आपला अनुभव सांगितला. हाडोळटी येथील एक लहान शेतकरी असलेल्या काशिनाथ जाधव यांना त्यांच्या जमिनीच्या नोंदींमधील विसंगतीमुळे अनेक समस्या भेडसावत होत्या. त्या दुरुस्त करण्यासाठी अनेकदा पाठपुरावा करावा लागत असे. या शिबिरात मात्र डिजिटल 7/12 दुरुस्ती आणि तात्काळ पडताळणीमुळे त्यांच्या समस्या चुटकीसरशी सुटल्या. शेतीच्या ऐन हंगामात वाचलेला वेळ, हा त्यांचा सर्वात मोठा फायदा ठरला.

नाळेगावच्या मीना गायकवाड यांना त्यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्राची आवश्यकता होती. मात्र त्यासाठीच्या प्रक्रियेबद्दल पुरेशी माहिती नसल्यामुळे त्यांनी अर्ज करण्यास विलंब केला होता. समाधान शिबिरात त्यांना केवळ प्रमाणपत्रच मिळाले नाही, तर शिष्यवृत्ती योजना आणि शैक्षणिक लाभांविषयी मार्गदर्शन सुद्धा करण्यात आले.

सेवा केंद्र आणि भविष्यातील संधींसाठी माहितीचा दुवा, अशा दोन्ही कामी, हे शिबिर उपयुक्त ठरले.

डिजिटल भूमी-अभिलेख (7/12 उतारे), ऑनलाइन प्रमाणपत्र जारी करणारे मंच, आधार-आधारित प्रमाणीकरण आणि एकात्मिक सेवा पोर्टल अशा प्रणालींचा समावेश असलेल्या एका सक्षम डिजिटल पायाभूत संरचनेमुळे हे परिवर्तन शक्य झाले आहे. या तंत्रज्ञानांनी त्वरीत प्रक्रिया आणि मंजुरी सक्षम करून प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित केल्या आहेत, ज्यामुळे जास्त पारदर्शकतेने कामे मार्गी लागताना दिसत आहेत. मानवी चुका कमी झाल्या आहेत आणि सर्व भागांमध्ये समान मानकांचा अवलंब करत सेवा प्रदान केल्या जात आहेत. अगदी ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्येही, या डिजिटल साधनांच्या वापरामुळे प्रशासन अधिक जलद, अधिक न्याय्य आणि नागरिकांसाठी लक्षणीयरीत्या अधिक सुलभ झाले आहे.

प्रशासकीय एकत्रीकरण ही समाधान शिबिराची सर्वात महत्त्वपूर्ण नवकल्पना होय. या शिबिरात अनेक विभाग एकाच मंचावर उपलब्ध होतात, त्यामुळे नागरिकांना एकाच भेटीत अनेक समस्यांचे निराकरण करणे शक्य होते. शेतकऱ्यांना भूमी-अभिलेख, पीक-संबंधित सेवा आणि इतर शासकीय योजनांचा लाभ घेता येतो, विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक प्रमाणपत्रे मिळवू शकतात आणि कुटुंबे आधार, शिधावाटप कार्ड आणि कल्याणकारी हक्क सहजपणे प्राप्त करू शकतात. या उपक्रमामुळे सेवा प्राप्त करण्यासाठी वारंवार कार्यालयांना भेट देण्याची गरज कमी झाली आहे आणि सेवा वितरणाची एकूण कार्यक्षमता सुधारली आहे. त्याचबरोबर या शिबिरांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे शासनाचे जबाबदार वर्तन अधोरेखित होते. अर्जांना प्रतिसाद मिळेल, अशी खात्री नागरिकांना वाटते, तक्रारींचे त्वरित निवारण होते आणि तात्काळ निर्णय घेतले जातात, ज्यामुळे नागरिकांचा शासनावरील विश्वास दृढ होतो.

'समाधान शिबिर' हा उपक्रम महाराष्ट्रात शासकीय सेवा प्रदानाच्या नव्या आणि आशादायक चित्रात रंग भरतो आहे. तंत्रज्ञान, प्रशासकीय एकत्रीकरण आणि नागरिक-केंद्रित विचारसरणी यांचा मेळ घालून, या उपक्रमाने सेवा वितरणाला नोकरशाही प्रक्रियेतून मुक्त करत मानवकेंद्रित अनुभवात रुपांतरित केले आहे.

शासकीय सेवा आता समाधानरित्या प्राप्त होत असल्याची भावना आता जनमानसात रुजते आहे.

## समाधान शिबिरातील काही क्षणचित्रे




*समाधान शिबिर, लातूर जिल्हा*








*(डावीकडे) श्री. विद्यसागर तोगार्गे लाभार्थी व्यक्तीला आधार प्रिंट देत आहे. हे घरपोच सेवा वितरणाचे यशस्वी उदाहरण.*

# तळागाळापर्यंत पोहोचते आहे आधार सेवा!

लातूर जिल्ह्यातल्या चाकूर तालुक्यातील रोहिना या शांत गावात नागरिक-केंद्रित शासनाचा प्रत्यय देणारे एक प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे. गावातील आपले सरकार सेवा केंद्राचे परिचालक श्री. विद्यासागर तोगार्गे यांच्या तत्पर आणि संवेदनशील कार्यपद्धतीमुळे तळागाळातील नागरिकांपर्यंत शासकीय सेवा पोहोचवण्याच्या प्रक्रियेला एक नवी गती आणि दिशा प्राप्त झाली आहे. या गावातील रुतुबाई भगवान केंडरे या वयोवृद्ध आणि आजारी महिलेला आधार सेवा प्राप्त करणे अशक्य वाटत होते. वयोमान आणि आजारपणामुळे आपले आधार तपशील अद्ययावत करण्यासाठी केंद्रापर्यंत पोहोचणे हे त्यांच्यासाठी मोठे आव्हान ठरत होते.

श्री. विद्यासागर तोगार्गे यांनी त्यांची समस्या लक्षात घेतली. आपल्या केंद्रापर्यंत येणे रुतुबाईंना शक्य होणार नाही, हे लक्षात घेत गृहभेटीच्या माध्यमातून त्यांचे आधार तपशील अद्ययावत करण्याच्या कामी त्यांनी पुढाकार घेतला. ते स्वत: रुतुबाईंच्या निवासस्थानी पोहोचले, आणि सर्व शासकीय मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत रुतुबाई केंडरे यांचे आधार तपशील अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण केली. हा त्यांच्या कामाचा भाग असला तरी अत्यंत आस्थेने एका गरजू नागरिकाला सन्मानाने सेवा उपलब्ध करून देत त्यांनी प्रशासनाच्या मानवी स्पर्शाची प्रचिती दिली.

महाआयटीच्या आपले सरकार सेवा केंद्रांच्या परिचालकांचे हे एक प्रातिनिधीक उदाहरण आहे. केवळ व्यवहार पूर्ण करण्यापुरती त्यांची भूमिका मर्यादित नसून ते शासन आणि नागरिक यांच्यातला महत्त्वाचा दुवा आहेत. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये ते घरपोच सेवा देतात, शारीरिक किंवा भौगोलिक अडचणींमुळे कोणतेही नागरिक शासकीय सेवांच्या लाभांपासून वंचित राहणार नाही, याची खात्री करतात.

या उपक्रमाचा परिणाम केवळ एका लाभार्थ्यापुरता मर्यादित नाही. रोहिनासारख्या गावांमध्ये अनेक वयोवृद्ध, अंथरुणाला खिळलेले रुग्ण तसेच दिव्यांग नागरिक शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रांपर्यंत पोहोचू शकत नाहीत, त्या सर्वांसाठी घरपोच आधार नोंदणी वरदान ठरली आहे. यामुळे अशा अर्जदारांचे इतरांवरील अवलंबित्व कमी झाले आहे, प्रवासाचा त्रास टळला आहे, आणि शासन व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या उपक्रमाने शासनाची संवेदनशीलता, प्रतिसादक्षमता आणि सर्वसमावेशकता अधोरेखित झाली आहे

तंत्रज्ञानाला संवेदनशीलतेची जोड देत, आपले सरकार सेवा केंद्रांचे परिचालक 'डिजिटल इंडिया' साकारण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. सक्षमीकरण केवळ शहरांपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्येक घरापर्यंत, प्रत्येक गावापर्यंत आणि प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवत आहेत.



# कुडाळमध्ये आधार संच वितरणामुळे नागरिक सेवा अधिक सुलभ होणार

सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने कुडाळ येथे अलीकडेच 'आधार संच' आणि 'आपले सरकार सेवा केंद्र' वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तळागाळापर्यंत नागरिक सेवा पोहोचतील, याची खातरजमा करण्यासाठी आणि सेवा वितरण अधिक प्रभावी करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण आणि निम-शहरी भागातील नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध करून देण्याचा, आणि सेवा केंद्र चालकांना सक्षम करण्याचा राज्य शासनाचा निर्धार या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

या कार्यक्रमाला इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री आशिष शेलार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शासनाच्या प्रतिमेसाठी सेवा केंद्र चालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. ते म्हणाले, "शासनाची खरी प्रतिमा ही तळागाळात काम करणाऱ्या सेवा पुरवठादारांच्या हातात असते. त्यांच्या कामातील गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता हीच शासनाची खरी ओळख ठरते."

## सेवा वितरण संबंधी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण

या उपक्रमांतर्गत सेवा केंद्र चालकांना आधार संच प्रदान करण्यात आले तसेच 'आपले सरकार सेवा केंद्र' नेटवर्कचा विस्तार करण्यात आला. ही केंद्रे नागरिकांना विविध शासकीय सेवा, प्रमाणपत्रे, नोंदणी, कल्याणकारी योजना आणि तक्रार निवारण मंच उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

आधार संच वितरणामुळे बायोमेट्रिक सेवांचे विकेंद्रीकरण होऊन शहरी केंद्रांवरील अवलंबित्व कमी होणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावाजवळच आवश्यक सेवा मिळणार असून वेळ आणि खर्च दोन्हींची बचत होणार आहे.

या कार्यक्रमादरम्यान मंत्रीमहोदय आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 'आपले सरकार' सेवा केंद्र चालकांशी थेट संवाद साधला. या संवादातून



*(सेवा केंद्र चालकांच्या हाती सरकारची प्रतिमा; माननीय मंत्री श्री. आशिष शेलार यांचे प्रतिपादन)*

स्थानिक पातळीवरील अडचणी, कार्यप्रणालीतील समस्या आणि सेवा सुधारण्याच्या संधी यांची माहिती मिळाली. अशा संवादातून तळागाळातील सेवा पुरवठादारांकडून प्रत्यक्ष अभिप्राय प्राप्त होतो, आणि शासनाची सहभागात्मक भूमिका अधिक दृढ होते.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवर आणि अधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये आमदार निलेश राणे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, नगराध्यक्ष प्राजक्ता बांदेकर, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, सभापती मिलिंद नाईक, उपसभापती सीताराम तेली, अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे, सांस्कृतिक विभागाचे प्रतिनिधी अजय पाटील, संचालक दीपक कदम, तहसीलदार सचिन पाटील यांचा समावेश होता.

## महाआयटी टीमचे योगदान

या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीत जिल्हा प्रशासन आणि महाआयटी प्रतिनिधींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश होता:

जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक: बसवराज चिकोडी
जिल्हा प्रकल्प प्रमुख: मयूर आयरे (रत्नागिरी)
रुपेश कुणकावळेकर (सिंधुदुर्ग)
सॉफ्टवेअर सपोर्ट अभियंता: शीतल प्रभू
टीम सदस्य: शशांक नाईक, शंकर भगत, पूजा सामंत, संतोष कांबळी, प्रतीक चिंदकर, शंकर बागड

महाआयटी टीमने तांत्रिक आणि कार्यकारी पातळीवर संपूर्ण सहकार्य देत कार्यक्रमाचे सुरेख नियोजन केले.

या कार्यक्रमात शिवकालीन साहसी कला-खेळांचे सादरीकरण करण्यात आले. या पारंपरिक सादरीकरणामुळे महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले आणि कार्यक्रमाची रंगत वाढली.

यावेळी आमदार निलेश राणे यांनी मंत्रिमहोदय आशिष शेलार यांच्या कार्याचा गौरव करत, दशावतार कलाकारांच्या ओळखपत्राचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न जलदगतीने सोडविल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की काही मिनिटांत शासन निर्णय काढून हा प्रश्न मार्गी लावण्यात आला, हे प्रतिसादक्षम प्रशासनाचे उत्तम उदाहरण आहे.

## डिजिटल महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हा उपक्रम 'डिजिटल महाराष्ट्र' या व्यापक दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. तंत्रज्ञानाधारित प्रशासनामुळे सर्वसमावेशकता, कार्यक्षमता आणि पारदर्शकता सुनिश्चित होत आहे. सेवा केंद्रांना सक्षम करून आणि आधुनिक साधनांनी सुसज्ज करून शासन डिजिटल दरी कमी करत आहे, ज्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांनाही आवश्यक सेवा सहजपणे उपलब्ध होत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आधार संच आणि 'आपले सरकार' सेवा केंद्र वितरण हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून नागरिक-केंद्रित प्रशासनाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार आहे. तळागाळातील पायाभूत सुविधा मजबूत करून, संवाद वाढवून आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महाराष्ट्र डिजिटल सेवा वितरणात नवे मापदंड प्रस्थापित करत आहे.

मा. मंत्रिमहोदय आशिष शेलार यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे, शासनाची खरी प्रतिमा ही धोरणांमध्ये नसून नागरिकांच्या दैनंदिन अनुभवांत दिसते, आणि हे अनुभव घडविण्याची जबाबदारी तळागाळातील सेवा पुरवठादारांवरच असते.

## क्षणचित्रे:









# डिजिटल सेवांचा प्रसार



## मुंबईतील वर्दळीच्या ठिकाणी 'आपले सरकार' पोर्टलचा प्रभावी प्रसार

मुंबईतील दादर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक तसेच दादर टीटी बसस्थानक अशा वर्दळीच्या ठिकाणी 'आपले सरकार' पोर्टलबाबत जनजागृती आणि प्रसार करण्यासाठी व्यापक अभियान राबविण्यात आले. त्याचबरोबर शहरातील विविध शासकीय आणि निम-शासकीय संस्थांच्या परिसरातही प्रभावी उपक्रम राबविण्यात आले.

या उपक्रमाच्या माध्यमातून 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विविध ऑनलाईन सेवांची सविस्तर माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. माहितीपत्रकांचे वितरण, प्रत्यक्ष मार्गदर्शन सत्रे तसेच प्रवासी आणि स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधून जनजागृती वाढविण्यावर या अभियानाचा विशेष भर होता.

रेल्वे स्थानके आणि बस स्थानकांसारख्या वर्दळीच्या ठिकाणांची निवड केल्यामुळे या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला आणि जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचता आले. या उपक्रमाच्या माध्यमातून हजारो नागरिकांना शासनाच्या डिजिटल सेवांबाबत माहिती मिळाली, आणि त्या अधिक प्रभावीपणे वापरण्याबाबतचे तपशील त्यांना उपलब्ध झाले.

डिजिटल शासन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला असून, तो नागरिकांच्या सक्षमीकरणाला चालना देणारा आहे. यामुळे शासनाच्या सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि सर्वांसाठी सोयीस्कर बनत आहेत.










# आधार शिबिरे




## लातूरमध्ये आधार शिबिरांचे आयोजन

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यातील नागरिकांना आधार नोंदणी आणि अद्यतन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, शासकीय योजनांचा लाभ घेणे अधिक सोपे झाले.

या अभियानांतर्गत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ आणि गातेगाव येथे आधार शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्थानिक नागरिकांनी आधार नोंदणी, दुरुस्ती आणि अद्यतनाची कामे करून घेतली. विशेषतः वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांना या शिबिरांचा मोठा फायदा झाला.

देवणी तालुक्यातील वालंदी येथेही आधार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या ठिकाणीही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून आधार-संबंधित सेवांचा लाभ घेतला. शिबिरातील तज्ज्ञ कर्मचाऱ्यांनी त्वरित सेवा दिल्यामुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचला.

नागरिकांना त्यांच्या गावाजवळच शासकीय सेवा उपलब्ध करून देणे, तसेच प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. महसूल विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

अशा शिबिरांमुळे नागरिकांना विविध योजनांसाठी आवश्यक असलेले आधार तपशील अद्ययावत ठेवणे सोपे झाले आहे. शासनाच्या या पुढाकारामुळे डिजिटल सक्षमीकरणाला चालना मिळत असून, ग्रामीण भागातील लोकांमध्ये जागरूकता वाढत आहे.

लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेली ही शिबिरे नागरिकाभिमुख प्रशासनाचे उत्तम उदाहरण ठरत आहेत. भविष्यात अशा उपक्रमांचा विस्तार होऊन अधिकाधिक नागरिकांना त्याचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा आहे.

### साकोळ येथे शिबिराचे आयोजन, तालुका – शिरूर अनंतपाळ, जिल्हा – लातूर

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत गातेगाव येथे आधार शिबिराचे आयोजन – तालुका, जिल्हा लातूर

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत वालंदी येथे आधार शिबिराचे आयोजन, तालुका – देवणी, जिल्हा – लातूर









# माननीय राष्ट्रपतींचा वर्धा दौरा



भारताच्या राष्ट्रपती आदरणीय द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम आश्रमाला भेट देत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित केली. डिजिटल आणि तंत्रज्ञानाधारित प्रगती करणाऱ्या आपल्या देशात गांधीवादी मूल्यांचे महत्त्व कायम असल्याचा सुस्पष्ट संदेश त्यांनी या दौऱ्यातून दिला.

या दौऱ्यादरम्यान सेवाग्राम आश्रमातल्या प्रार्थनासभेत त्या सहभागी झाल्या, तसेच या परिसरात वृक्षारोपण करून त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. चरख्यावर सूत कातत राष्ट्रपतींनी स्वावलंबन आणि शाश्वततेच्या गांधीवादी तत्त्वांना उजाळा दिला. आपल्या कृतींमधून आधुनिकतेसोबत सांस्कृतिक मूल्यांचा समतोल राखण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

आश्रमातील बापूकुटी, 'बा' निवास आणि गांधीजींचे कार्यालय अशा ऐतिहासिक स्थळांनाही राष्ट्रपतींनी भेट दिली. त्या काळातील जीवनशैली, शिस्त आणि साधेपणाविषयी त्यांना माहिती देण्यात आली. सेवाग्राम आश्रम आजही साधेपणा, स्वावलंबन आणि नैतिक नेतृत्वाचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. माननीय राष्ट्रपतींच्या भेटीने या मूल्यांची आजच्या काळात असलेली गरज अधिक ठळकपणे व्यक्त झाली.

राष्ट्रपतींच्या सेवाग्राम आश्रम भेटीप्रसंगी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर उपस्थित होते. आश्रम प्रतिष्ठानच्या वतीने सचिव विजय तांबे आणि विश्वस्त चंदनपाल यांनी माननीय राष्ट्रपतींचे स्वागत केले.

विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभालाही माननीय राष्ट्रपतींनी उपस्थिती लावली. याप्रसंगी त्यांनी शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेमध्ये भारतीय भाषांचे, विशेषतः हिंदीचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक काळातील शैक्षणिक गरजांशी जुळवून घेत असताना भाषिक वारसा जतन करण्यात विद्यापीठासारख्या संस्थांच्या महत्वाच्या भूमिकेवर त्यांनी प्रकाश टाकला.



माननीय राष्ट्रपतींच्या या दौऱ्याने गांधीवादी तत्त्वज्ञानाचे पुनरुज्जीवन करण्याबरोबरच तंत्रज्ञान-आधारित शिक्षणाप्रती भारताची वचनबद्धता आणि डिजिटल इंडियाची संकल्पना अधिक दृढ करण्याचा दुहेरी संदेश प्रभावीरित्या प्रसारित केला.



# शासन व्यवस्थेची क्वांटम झेप!



## अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगासाठी महाराष्ट्राचा धोरणात्मक आराखडा

वर्ल्ड क्वांटम डेच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे मंत्रालयात 'क्वांटम तंत्रज्ञान' विषयावर उच्चस्तरीय प्रशिक्षण व जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात धोरणकर्ते, तज्ज्ञ, संशोधक तसेच वरिष्ठ शासकीय अधिकारी सहभागी झाले होते. जलदगतीने विकसित होत असलेल्या क्वांटम युगासाठी राज्याची सज्जता आणि दिशा यावर या सत्रात सखोल चर्चा करण्यात आली.

दरवर्षी 14 एप्रिल रोजी साजरा होणारा 'वर्ल्ड क्वांटम डे' हा सुरक्षित संवादव्यवस्था, प्रगत संगणन (ॲडव्हान्स कम्प्युटींग), अचूक मापन तंत्रज्ञान, आरोग्यसेवा आणि राष्ट्रीय सुरक्षा अशा विविध क्षेत्रांमध्ये क्वांटम तंत्रज्ञानाच्या परिवर्तनक्षम क्षमतेवर प्रकाश टाकतो. जगभरातील देश या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहेत आणि धोरणात्मक उपक्रम राबवत आहेत, अशावेळी शासकीय यंत्रणांमध्ये या तंत्रज्ञानाबाबत जागरूकता आणि तयारी निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे.

या जागतिक पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन 'क्वांटम धोरण' तयार करण्याच्या दिशेने सक्रियपणे कार्यरत आहे. या धोरणाद्वारे शासन व्यवस्था, सार्वजनिक सेवा वितरण आणि महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये क्वांटम तंत्रज्ञानाचा स्वीकार, विकास आणि प्रभावी वापर यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. यामुळे महाराष्ट्र अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आघाडीवर राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव श्री. विरेंद्र सिंह यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी क्वांटम तंत्रज्ञानाच्या बदलत्या स्वरूपाचा विचार करता लवकर तयारी आणि संस्थात्मक क्षमतावृद्धीचे महत्त्व अधोरेखित केले. क्वांटम विज्ञान हे आता केवळ सैद्धांतिक संशोधनापुरते मर्यादित नसून, संवाद, आरोग्य, वित्तीय सेवा आणि राष्ट्रीय सुरक्षा यांसारख्या क्षेत्रांमध्ये ते परिवर्तन घडवून आणत असल्याचे त्यांनी नमूद केले.

क्वांटम क्रिप्टोग्राफीसारख्या नवकल्पनांमुळे डेटा सुरक्षेच्या पारंपरिक पद्धतींना आव्हान निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. धोरणकर्त्यांसाठी ही संधी नवोन्मेषाला चालना देण्याची, उद्योगवाढ वेगाने साध्य करण्याची आणि भारताला जागतिक स्तरावर प्रगत तंत्रज्ञानात अग्रस्थानी नेण्याची आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी संशोधन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील दरी भरून काढण्यासाठी संवाद, सहकार्य आणि क्षमतावृद्धीला चालना देणाऱ्या व्यासपीठांची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल यांनी आपल्या प्रमुख भाषणात भविष्यवेधी शासन व्यवस्थेत क्वांटम तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी विज्ञान आणि तत्त्वज्ञान यातील साधर्म्य दाखवत 'काळाचा विस्तार (टाइम डिलेशन)', 'क्वांटम सुपरपोजिशन' आणि 'क्वांटम एंटँगलमेंट' या संकल्पना आधुनिक विज्ञानात जशा महत्त्वाच्या आहेत, त्याचप्रमाणे भारतीय तत्त्वज्ञानातही त्यांचे प्रतिबिंब दिसते, असे नमूद केले.

भारतीय तंत्रज्ञान संस्था दिल्ली येथे शिक्षण घेत असताना मिळालेल्या अनुभवांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, क्वांटम यांत्रिकी ही पारंपरिक न्यूटनियन भौतिकशास्त्रापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. पारंपरिक संगणनात '0' किंवा '1' अशा द्विस्तरीय बिट्सचा वापर होतो, तर क्वांटम संगणनात 'क्युबिट्स' एकाच वेळी अनेक अवस्थांमध्ये अस्तित्वात राहू शकतात, ज्यामुळे संगणनाची क्षमता प्रचंड वाढते.

औषधनिर्मिती, शेती आणि गुंतागुंतीच्या सिम्युलेशन्ससारख्या क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा मोठा उपयोग होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. त्याचवेळी, सध्याच्या 'प्राइम फॅक्टरायझेशन'वर आधारित एन्क्रिप्शन प्रणालींना भविष्यात धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे 'क्वांटम-सुरक्षित' सुरक्षा प्रणाली विकसित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. 'मित्रा' उपक्रमासह आयआयटी मुंबईसारख्या संस्थांमध्ये सुरू असलेल्या संशोधनामुळे भारत या क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून, महाराष्ट्र त्यात सक्रिय भूमिका बजावत आहे, असे त्यांनी नमूद केले.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. आशिष शेलार यांनी आपल्या विशेष भाषणात उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राच्या नेतृत्वाची भूमिका अधोरेखित केली. क्वांटम विज्ञानाच्या संकल्पना जरी आधुनिक वाटल्या, तरी त्यांचा पाया भारतीय तत्त्वज्ञानाशी सुसंगत असल्याचे त्यांनी सांगितले.

'बिट्स'पासून 'क्युबिट्स'कडे होणारा प्रवास हा संगणन आणि समस्यांच्या निराकरणातील मोठा बदल आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. क्वांटम तंत्रज्ञान हे केवळ कल्पनारम्य नसून, आरोग्य, वित्त आणि राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रात क्रांती घडविण्याची क्षमता त्यात आहे, असे त्यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या एकत्रित वापरामुळे अनेक गुंतागुंतीच्या समस्या अल्पावधीत सोडविणे शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या 'नॅशनल क्वांटम मिशन'चा उल्लेख करत त्यांनी भारतात या क्षेत्रासाठी मजबूत धोरणात्मक पायाभूत सुविधा निर्माण होत असल्याचे सांगितले. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि आयआयटी मुंबई यांसारख्या संस्थांसोबत सहकार्य करून महाराष्ट्र क्वांटम संगणन, डीप-टेक नवकल्पना आणि सेमिकंडक्टर निर्मिती क्षेत्रात प्रगती करत असल्याचे त्यांनी नमूद केले. रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि मजबूत परिसंस्था उभारणीवर राज्याचा भर असून, सर्व संबंधितांनी या क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

तांत्रिक सत्रांमध्ये क्वांटम तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना आणि धोरणात्मक परिणाम यांवर सखोल माहिती देण्यात आली.

पहिल्या सत्रात 'क्वांटम तंत्रज्ञानाची मूलतत्त्वे आणि जागतिक परिदृश्य' या विषयावर आयआयएसईआर पुणे येथील प्रा. उमाकांत डी. रापोल यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'क्वांटम रेव्होल्यूशन 1.0'पासून 'क्वांटम रेव्होल्यूशन 2.0'पर्यंतच्या प्रवासाचे विवेचन केले. क्वांटम संगणन, सुरक्षित संवाद आणि सेन्सिंग तंत्रज्ञानातील प्रगतीबरोबरच नासाद्वारे चाचणी केलेल्या क्वांटम सेन्सर्समुळे जीपीएसशिवाय अचूक नेव्हिगेशन शक्य होण्याची माहिती त्यांनी दिली.



***महाराष्ट्र शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपली उपस्थिती दर्शवून या प्रसंगाचे महत्त्व अधोरेखित केले.***

'क्वांटम LiDAR', 'ॲटोमिक क्लॉक्स' आणि 'मॅग्नेटोमीटर'सारख्या तंत्रज्ञानांचा ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि संसाधन व्यवस्थापनावर होणारा परिणाम त्यांनी स्पष्ट केला. जागतिक स्तरावर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून, भारत 'नॅशनल क्वांटम मिशन' आणि 'NM-ICPS'सारख्या उपक्रमांद्वारे प्रगती करत आहे. प्रतिभाविकास, स्टार्टअप्स आणि उद्योग-शैक्षणिक सहकार्य यांचा समन्वय साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दुसऱ्या सत्रात 'क्वांटम सुरक्षा आणि धोरणात्मक सज्जता' या विषयावर आयबीएम रिसर्च इंडिया येथील संचालक श्री. अमित सिंघी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी क्वांटम तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षा आव्हानांचा आढावा घेत 'क्वांटम-सुरक्षित' क्रिप्टोग्राफीकडे तातडीने वळण्याची गरज अधोरेखित केली.

वित्त आणि आरोग्य क्षेत्रात गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'हायब्रिड क्वांटम-क्लासिकल' पद्धतींचा वापर होत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, सध्याच्या एन्क्रिप्शन प्रणाली भविष्यात असुरक्षित ठरू शकतात, असा इशारा देत 'हार्वेस्ट नाऊ, डिक्रिप्ट लेटर' (आता संकलन करा, नंतर उकल करा) या धोक्याचा उल्लेख त्यांनी केला. 2029 ते 2033 दरम्यान प्रगत क्वांटम संगणक उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी 'राष्ट्रीय मानके व तंत्रज्ञान संस्थे' सारख्या आंतरराष्ट्रीय मानकांनुसार सुरक्षा उपाययोजना करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

या सत्रांनंतर प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये सहभागी अधिकाऱ्यांनी तज्ज्ञांशी थेट संवाद साधून शासन व्यवस्थेत क्वांटम तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल, याबाबत मार्गदर्शन घेतले.

कार्यक्रमाचा समारोप महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय काटकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. त्यांनी सर्व मान्यवर, तज्ज्ञ आणि सहभागी यांचे योगदान अधोरेखित केले. यावेळी त्यांनी नमूद केले की, अशा उपक्रमांमुळे केवळ जागरूकता वाढत नाही, तर ज्ञानविनिमय, संस्थात्मक सहकार्य आणि दीर्घकालीन धोरणात्मक सज्जतेलाही अधिक बळकटी मिळते. क्वांटमसारख्या अत्याधुनिक क्षेत्रात राज्याची सक्षम आणि सज्ज वाटचाल सुनिश्चित करण्यासाठी ही पावले अत्यंत महत्त्वाची ठरत आहेत.

एकूणच, या सत्राद्वारे महाराष्ट्रात क्वांटम तंत्रज्ञानाविषयी संवादाची सुरुवात झाली असून, संस्थात्मक क्षमता वाढविणे आणि भविष्योन्मुख शासन व्यवस्था उभारण्यासाठी भक्कम पायाभरणी करण्यात आली आहे.

# सार्वजनिक सेवेला नवी दिशा



## मुलुंडमधील 'सेतू सुविधा केंद्रा' मुळे स्मार्ट प्रशासनाला बळ

मुंबईतील मुलुंडमध्ये नागरिकाभिमुख प्रशासनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. तहसीलदार कार्यालयात अत्याधुनिक 'सेतू सुविधा केंद्र' सुरु करण्यात आले आहे. शासनाच्या विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देत नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्याचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे मंत्री, माननीय श्री. आशीष शेलार यांच्या हस्ते 14 एप्रिल रोजी या केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी हा उपक्रम सुरु करण्यात आल्याने सामाजिक न्याय, समता आणि सर्वांसाठी सुलभ प्रशासन या मुल्यांशी त्याचा सुंदर संगम साधला गेला.

जिल्हाधिकारी श्री. सौरभ कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आलेले हे सेतू सुविधा केंद्र नागरिकांना शासकीय सेवा मिळविताना येणाऱ्या अनेक अडचणी दूर करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. अविरत रांगा, विविध कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या, प्रक्रिया समजण्यात होणारा गोंधळ आणि पारदर्शकतेचा अभाव या सर्व समस्यांवर या केंद्रामुळे प्रभावी उपाय उपलब्ध झाला आहे.

उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, अधिवास प्रमाणपत्र तसेच विविध शासकीय परवानग्या यांसारख्या अनेक सेवा आता नागरिकांना एकाच ठिकाणी, जलद आणि सुलभ पद्धतीने मिळू शकणार आहेत. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होईल. तसेच नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल.

हा उपक्रम, प्रशासनाच्या कार्यपद्धतीतील बदलाचे प्रतीक ठरणार आहे. नागरिकांनी व्यवस्थेच्या मागे धावण्याऐवजी, व्यवस्था स्वतः नागरिकांपर्यंत पोहोचून सेवा देणार, हीच या केंद्रामागील मुख्य संकल्पना आहे. डिजिटल प्रणाली आणि प्रत्यक्ष सहाय्य यांचा प्रभावी संगम साधत हे केंद्र सेवा वितरणात वेग, जबाबदारी आणि पारदर्शकता सुनिश्चित करते.

कार्यक्रमावेळी, सार्वजनिक सेवा हक्क आयोगाचे आयुक्त तथा वरिष्ठ जिल्हा अधिकारी श्री. दिलीप शिंदे उपस्थित होते. प्रशासन अधिक आधुनिक, उत्तरदायी आणि लोकाभिमुख करण्याच्या व्यापक प्रयत्नांचा हा भाग असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती, ज्यातून या उपक्रमाबद्दलचा जनविश्वास आणि उत्सुकता स्पष्टपणे दिसून आली.

मंडल अधिकारी श्रीमती. रंजना राठोड यांनी सांगितले की, या केंद्रामुळे नागरिकांना विविध विभागांमध्ये वारंवार जावे लागणार नाही. त्यामुळे वेळ, श्रम आणि खर्च यांची मोठ्या प्रमाणात बचत होईल. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, सेवांची निश्चित कालमर्यादित पूर्तता होऊन विलंब आणि प्रक्रियात्मक गोंधळ कमी होईल.

मुलुंडमधील नागरिकांसाठी हे केंद्र म्हणजे सन्मान, कार्यक्षमता आणि सुलभतेची हमी आहे. वाढती शहरी लोकसंख्या आणि सार्वजनिक सेवांकडून वाढणाऱ्या अपेक्षा लक्षात घेता, अशा एकात्मिक सेवा केंद्रांची संकल्पना भविष्यातील प्रशासनाचा मजबूत पाया ठरू शकते.

मुलुंडचे सेतू सुविधा केंद्र हे तंत्रज्ञान, प्रशासकीय इच्छाशक्ती आणि नागरिक-केंद्रित दृष्टिकोन यांच्या प्रभावी एकत्रीकरणाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. दैनंदिन शासकीय सेवा अधिक सहज, सुलभ आणि विश्वासार्ह करण्याच्या दिशेने हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.



# क्षमता विकास



## डिजिटल शासनामध्ये क्षमता विकासासाठी महाआयटी आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांची भागीदारी

महाराष्ट्रात डिजिटल शासनाचा विस्तार वेगाने होत असताना, नागरिकांना मदत करू शकणारे, शासकीय प्रणाली योग्य प्रकारे हाताळू शकणारे आणि सेवा वितरण अधिक प्रभावी बनवू शकणारे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची गरज प्रकर्षाने अधोरेखित होते आहे. या पार्श्वभूमीवर महाआयटीने स्थापन केलेला क्षमता उभारणी कक्ष आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासोबत केलेली भागीदारी हे कालसुसंगत आणि महत्त्वाचे पाऊल आहे.

डिजिटल शासन हे केवळ तंत्रज्ञान, पोर्टल्स किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मपुरते मर्यादित नाही. जे लोक या प्रणाली प्रभावीपणे वापरू शकतात, नागरिकांना सेवा मिळवून देऊ शकतात, स्थानिक पातळीवरील अडचणी सोडवू शकतात आणि सार्वजनिक सेवा वितरण अधिक परिणामकारक करू शकतात, अशा लोकांवरही ते अवलंबून आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

महाआयटी आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या भागीदारीचे फलित असणारा "डिजिटल शासन आणि नागरिक सक्षमीकरण" हा अभ्यासक्रम या दृष्टीने महत्वाचा ठरतो. शासन, डिजिटल प्रणाली, नागरिकांचे हक्क, सेवा वितरण आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय काम अशा बाबींचा या अभ्यासक्रमात समावेश आहे. राज्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण क्षेत्रात क्षमता निर्माण करण्याचा हा एक प्रभावी प्रयत्न आहे. विशेष म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेने या अभ्यासक्रमाला तत्त्वत: मान्यता दिली आहे. या संकल्पनेला परिषदेत अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला. परिषद सदस्यांनी या अभ्यासक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले, या उपक्रमाचे स्वागत केले आणि अशी कल्पना पुढे आणल्याबद्दल संबंधितांचे अभिनंदन केले. चर्चेदरम्यान काही उपयुक्त सूचनादेखील प्राप्त झाल्या असून त्या अभ्यासक्रमाच्या पुढच्या टप्प्यात समाविष्ट केल्या जाणार आहेत.

या प्रस्तावित अभ्यासक्रमाची रचना व्यावहारिक आणि सर्वसमावेशक आहे. या अभ्यासक्रमात शासनाची मूलतत्त्वे, डिजिटल परिवर्तन, धोरणात्मक चौकट, संस्थात्मक रचना, नागरिकांचे हक्क आणि कायदेशीर जबाबदाऱ्या यांचा समावेश आहे. तसेच यात आधार, ईकेवायसी, डिजीलॉकर, इ-साइन, यूपीआय आणि सायबर सुरक्षा अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची ओळख करून दिली जाते, त्याचबरोबर महाराष्ट्रातील आघाडीचे डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि त्यांच्या सेवा प्रक्रियांशी विद्यार्थ्यांना अवगत केले जाते.

हा अभ्यासक्रम शासकीय मंचांचे केवळ तांत्रिक ज्ञान देत नाही, तर त्यात नागरिकांशी संवाद, आरटीएस अनुपालन, नैतिकता, सचोटी, तक्रार निवारण आणि व्यावसायिक आचरण अशा महत्त्वाच्या बाबींवर स्वतंत्रपणे लक्ष दिले आहे, ही या अभ्यासक्रमाची एक मोठी जमेची बाजू आहे. याशिवाय, व्हीएलई आणि स्थानिक सेवा पुरवठादारांच्या दृष्टिकोनातून डिजिटल उपजीविका आणि उद्योजकता, तसेच डेटा-आधारित शासन, स्मार्ट गव्हर्नन्स, समुदाय नेतृत्व, डिजिटल समावेशन आणि वास्तविक समस्यांचे निराकरण करण्याचे शिक्षण असे विषयही यात समाविष्ट आहेत.

भविष्यात या अभ्यासक्रमाचा विस्तार केला जाणार आहे. आगामी काळात यात नागरिक अनुभव आणि सेवा रचना, तळागाळापर्यंत सेवा वितरणातील अडचणी, डिजिटलदृष्ट्या वंचित गटांना सहाय्य, क्षेत्रीय पातळीवरील समस्यांचे निराकरण, सार्वजनिक संवाद आणि विश्वास निर्माण, डिजिटल तक्रार निवारण,कृत्रिम बुद्धिमत्तेचा शासनातील जबाबदार वापर, तसेच महाराष्ट्राच्या डिजिटल सेवा व्यवस्थेतील प्रत्यक्ष समस्यांसारखे विषयही समाविष्ट केले आहे, परिणामी हा अभ्यासक्रम गरजांनुसार आणखी सक्षम आणि सुसंगत होत राहिल.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ परिसरात महाआयटी क्षमता उभारणी कक्ष सुद्धा स्थापन करत आहे. हा कक्ष अभ्यासक्रम विकास, प्रशिक्षण आराखडा, क्षेत्रीय क्षमता विकास आणि दीर्घकालीन ज्ञानाधारित सहाय्य यासाठी एक समर्पित केंद्र म्हणून विकसित होईल, अशी अपेक्षा आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बलस्थानांमुळे या भागीदारीचे महत्त्व आणखी वाढले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या कायद्यान्वये स्थापन झालेले राज्यस्तरीय शासकीय विद्यापीठ आहे. नाशिकमध्ये मुख्यालय असलेल्या या विद्यापीठाची महाराष्ट्रात ८ प्रादेशिक केंद्रे आहेत, तसेच राज्यभर पसरलेली 1,711 शिक्षण आणि विद्यार्थी सहाय्य केंद्रे आहेत. या विस्तृत जाळ्यामुळे विद्यापीठाला मोठ्या प्रमाणावर शिक्षण पोहोचविण्याची आणि राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची विशेष क्षमता प्राप्त झाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत हा अभ्यासक्रम उपलब्ध होणार असल्यामुळे तो व्यापक स्तरावर पोहोचण्याची शक्यता आहे, ही या उपक्रमाची महत्त्वाची बाजू आहे. त्यामुळे डिजिटल शासन आणि नागरिक सक्षमीकरणाशी संबंधित शिक्षण मर्यादित गटापुरते राहणार नाही, तर कालांतराने ते महाराष्ट्रातील अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत आणि इतर इच्छुकांपर्यंत पोहोचू शकेल. सार्वजनिक स्वरूप, विश्वासार्हता आणि व्यापक पोहोच असलेल्या संस्थेमार्फत हा अभ्यासक्रम उपलब्ध होणे, ही सुद्धा जमेची बाजू आहे.

आगामी काळात प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज निश्चितच वाढत जाणार आहे. डिजिटल शासन व्यवस्थेचा विस्तार होत असताना, नागरिक सेवा, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, सेवा प्रक्रिया, क्षेत्रीय अंमलबजावणी आणि नागरिकाभिमुख समस्या सोडविणे यांची समज असलेले मनुष्यबळ उपयुक्त ठरणार आहे. सेवा केंद्रे, प्रशिक्षण व्यवस्था, अंमलबजावणी सहाय्य यंत्रणा आणि नव्याने उदयाला येणाऱ्या सार्वजनिक सेवा क्षेत्रांमध्येही अशी कौशल्ये अत्यंत उपयुक्त ठरतील. त्यामुळे हा अभ्यासक्रम शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचा आहेच, आणि त्याचबरोबर भविष्यातील संधींशीही जोडलेला आहे.

महाआयटीकडे डिजिटल शासन, नागरिक सेवा वितरण आणि राज्यस्तरीय अंमलबजावणीचा अनुभव आहे, तर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे शैक्षणिक बळ, सार्वजनिक विश्वासार्हता, व्यापक पोहोच आणि मोठ्या प्रमाणावर शिक्षण देण्याची क्षमता आहे. या दोघांच्या भागिदारीमुळे महाराष्ट्रासाठी अधिक मजबूत क्षमता विकास प्रणालीची पायाभरणी होत आहे.

आज जास्तीत जास्त नागरिक शासनाशी डिजिटल प्रणालींमार्फत जोडले जात असताना, महाराष्ट्राला केवळ चांगल्या डिजिटल मंचांचीच नाहीतर अधिक सक्षम आणि सज्ज मनुष्यबळाचीही गरज आहे. त्या अर्थाने क्षमता उभारणी कक्ष आणि “डिजिटल शासन आणि नागरिक सक्षमीकरण” हा अभ्यासक्रम हे दोन्ही उपक्रम, डिजिटल शासनामध्ये केलेली महत्त्वाची गुंतवणूक ठरतात.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेकडून अभ्यासक्रमाला मिळालेली तत्वत: मान्यता, त्याला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आणि क्षमता उभारणी कक्षाची स्थापना या बाबी एका महत्त्वपूर्ण स्थित्यंतराची चाहूल देणाऱ्या आहेत. महाराष्ट्रातील डिजिटल शासनाच्या भविष्यासाठी अर्थपूर्ण योगदान देण्याची क्षमता या भागीदारीमध्ये आहे, यात शंकाच नाही.

# योगदान:

**मजकूर योगदान:**
धीरेंद्र सिंग

**संपादन:**
माधुरी पांगे

**तपशील समन्वय, संकलन आणि यशोगाथा:**
प्रज्योत आयरे आणि जिल्हास्तरीय सहकारी
रवींद्र गांगुर्डे
पृथ्वीराज हणमंतराव बिरादार

**रचना, सजावट:**
हर्षवर्धन बगाडे
सूर्यकांत उभे

**संपादकीय योगदान:**
माधुरी पांगे
दिशा खातू
सुभाष शेळके
नरेश इंगळे
मुकेश शर्मा

## आम्हाला फॉलो करा

@MahaIT
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
आपले सरकार


## प्रकाशक

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

अपीजे हाऊस, तिसरा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र 400020

**ई-मेल:** editor@mahait.org
**संकेतस्थळ:** https://mahait.org